मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०२ ■ गुरुवार, ०२ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## प्रबोधनाची अखंड ज्योत विझली

### ह.भ.प. मधुकर महाराज बारुळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**( प्रतिनिधी - अरविंद पांचाळ)** : नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारी घटना म्हणजे प्रखर प्रबोधनकार, मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक तसेच संत नामदेव-तुकाराम वारकरी परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शिवभक्त परायण मधुकर महाराज बारुळकर यांच्या आकस्मिक निधनाची बातमी होय.



दि. ३१ मार्च २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित मराठा सेवा संघाच्या "शिव कुटुंब मेळावा"मध्ये दिवसभर सक्रिय सहभाग नोंदवल्यानंतर सायंकाळी गावाकडे परतत असताना सिडको परिसरातील ढवळे कॉर्नरजवळ झालेल्या अपघातात त्यांचे दुःखद निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण बहुजन व मराठा समाजावर शोककळा पसरली असून समाजप्रबोधनाचा बुलंद आवाज कायमचा शांत झाला आहे.कंधार तालुक्यातील बारूळ या गावात ७ जुलै १९७१ रोजी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले मधुकर निवृत्ती पाटील कदम हे पुढे "मधुकर महाराज बारुळकर" म्हणून जनमानसात प्रसिद्ध झाले. लहानपणापासून साधेपणा, कष्ट आणि संस्कार यांची जोड लाभलेल्या महाराजांनी सुरुवातीला कीर्तन व प्रवचनातून अध्यात्मिक विचार मांडले. १९९२ नंतर मराठा सेवा संघाच्या परिवर्तनवादी विचारांचा प्रभाव पडताच त्यांनी समाजप्रबोधन हेच जीवनध्येय स्वीकारले.

संत परंपरेतील विचार आणि आधुनिक सामाजिक क्रांतीकारकांची तत्त्वे यांचा संगम त्यांच्या प्रबोधनात दिसून येत असे. संत तुकारामांच्या अभंगातून भक्ती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून स्वाभिमान, छत्रपती शाहू महाराजांच्या धोरणातून सामाजिक न्याय, तसेच महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून समतेचा संदेश त्यांनी प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवला.महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा व मध्यप्रदेश या राज्यांत त्यांनी हजारो कीर्तन, प्रवचने व व्याख्याने देत समाजजागृती केली. त्यांच्या भाषणात अभ्यासपूर्ण मांडणी, तर्कशुद्ध विचार आणि निर्भीडपणा यांचा संगम दिसत असे. अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका आणि सत्य मांडण्याचे धाडस हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

# शिवरायांच्या आरमाराचा वारसा!

# 'मालवण' युद्धनौका नौदलात दाखल

**नवी दिल्ली :** कोची येथील कोचीन शिपयार्ड लिमिटेडने बांधलेली दुसरी पाणबुडीविरोधी युद्धनौका 'मालवण' भारतीय नौदलाच्या ताफ्यात सामील झाली आहे. आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत स्वदेशी संरक्षण उत्पादनांना चालना देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे बोलले जाते. ३१ मार्च रोजी, ही युद्धनौका नौदलाच्या स्वाधीन करण्यात आली. नौदलाला अशा आठ अँटी सबमरीन युद्धनौका मिळणार आहेत. त्यातील ही दुसरी युद्धनौका आता सेवेत रुजू होत आहे.



'मालवण' हे नाव महाराष्ट्रातील किनारपट्टीवरील ऐतिहासिक शहर असलेल्या 'मालवण'वरून घेण्यात आले आहे. हा प्रदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली सागरी वारशाशी जोडला गेलेला आहे. ही युद्धनौका पूर्वीच्या 'आय एन एस मालवण' या भारतीय नौदलाच्या सुरुंग शोधक जहाजाचा वारसाही पुढे चालवते. हे जुने जहाज २००३ पर्यंत सेवेत होते. अशा प्रकारे, प्रतिष्ठित युद्धनौकांची नावे जतन करण्याची नौदलाची परंपरा या जहाजाद्वारे अखंडपणे सुरू ठेवली गेली आहे.

ही युद्धनौका पाण्याखाली पाळत ठेवणे, किनारपट्टीजवळील पाण्यात पाणबुडीविरोधी युद्धमोहिमा (एएसडब्ल्यू) राबवणे, कमी तीव्रतेच्या सागरी कारवाया (लिमो) आणि सुरुंग युद्धक्षमता यांसाठी सुसज्ज आहे. सुमारे ८० मीटर लांबी आणि १,१०० टन विस्थापन क्षमता असलेल्या या युद्धनौकेवर टॉर्पेडो, बहुउद्देशीय पाणबुडीविरोधी रॉकेट्स आणि प्रगत रडार व सोनार प्रणालींसह अत्याधुनिक सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. शत्रूच्या पाणबुड्यांचा शोध घेणे आणि त्यांना निष्क्रिय करण्यात सक्षम असलेल्या 'मालवण'मुळे आता नौदलाची ताकद आणखी वाढली आहे.

संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी घटकांचा समावेश असलेली 'मालवण' ही युद्धनौका स्वदेशी युद्धनौका बांधणीच्या क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे; तसेच ती भारत सरकारचा 'आत्मनिर्भर भारत' हा दृष्टिकोन पुन्हा एकदा अधोरेखित करते.

ही युद्धनौका अशी उपकरणे आणि प्रणाली अभिमानाने वाहून नेते, ज्यांची निर्मिती आणि एकत्रीकरण देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षेत्रातील उद्योगांनी केले आहे, यामध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा समावेश आहे, असेही संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

## सेवा सहकारी सोसायटी संस्था मर्या .सेलू खू येथील निवडणूक संपन्न



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील : वाशिम** तालुक्यात सेलू खू येथे सेवा सहकारी सोसायटी संस्था. मर्या निवडणूक संपन्न. या निवडणुकीमध्ये काशीराम पांडुरंग सावके यांच्या नेतृत्वाखाली १२. जन निवडून आणून सेलू खू मध्ये एक हाती सत्ता मिळवली.त्यामध्ये उमेदवार.आनंदा पांडुरंग सावके, दत्तराव नामदेव आरू, वसंता विठोबा आरु, लक्ष्मीबाई सोपान आरू,डिगाबर शंकर सावके, महादेव विश्वनाथ सावके, सुभाष आनंदा उगले, चंद्रभान नारायण ठाकरे, महादेव किसन वानखेडे, मधुकर सखाराम सावंत, भीमराव गणपत धुळधुळे, मंजुळाबाई रघुनाथ धुळधुळे, तसेच गट ग्रामपंचायत सापळी सरपंच महादेव आनंदा सावके यांनी सुद्धा या निवडणुकीमध्ये अथक परिश्रम घेतले.

## लिंबागणेश येथे एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती; भालचंद्र विद्यालयात पालक व विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**शेख महेशर ताहेर, पाटोदा (प्रतिनिधी):-** गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात ८ मार्च, जागतिक महिला दिनापासून करण्यात आली आहे. १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी ही लस उपलब्ध करून देण्यात आली असून लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातही लस उपलब्ध आहे.

याच पार्श्वभूमीवर दिनांक ०१ एप्रिल बुधवार रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बीड तालुक्यातील लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात पालक व विद्यार्थिनींना गर्भाशयाच्या कर्करोगाचे




वाढते प्रमाण, त्याची कारणे, लक्षणे तसेच प्रतिबंधात्मक उपाय या बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक किसन सावंत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद मोटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी केले. या वेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.क्रांती देशपांडे आणि डॉ.सुनिता बारकुल यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितले. तसेच विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन करून आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील लोखंडे, गर्जे, वीर, कदम, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. या उपक्रमामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये एचपीव्ही लसीकरणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून जनजागृतीत मोठी वाढ होणार असल्याची प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली

एचपीव्ही लस पूर्णतः सुरक्षित :- डॉ.क्रांती देशपांडे, डॉ.सुनिता बारकुल

एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित असून आतापर्यंत कोणते ही गंभीर दुष्परिणाम आढळलेले नाहीत. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक पात्र मुलीने ही लस घेणे आवश्यक आहे.

पालकांनी कोणताही संभ्रम न बाळगता लसीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ.क्रांती देशपांडे आणि डॉ.सुनिता बारकुल यांनी केले.

## जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये मातोश्री विद्यालय महागाव चे यश



**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये मातोश्री विद्यालय महागाव च्या विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली वयोगट १४, १७ ,१९ ,मुला मुलीच्या संघाने जिल्हास्तरावर विजय मिळून विभागीय खेळा साठी आपली निवड पक्की केली सदर खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून विद्यालयाचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या त्याचप्रमाणे विद्यालयाचे कर्मचारी वृंद व पालक वर्ग यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या

## फेडरेशनच्या वतीने सामाजिक संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींची चिंतन बैठक संपन्न; बैठकीत विभागीय व जिल्हा कार्यकारणी जाहीर

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर,मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** नांदेड- सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी मान्यता असलेल्या संस्था, संघटना एकत्र येऊन महासंघ म्हणजेच फेडरेशन स्थापन झालेल्या प्रतिनिधींची चिंतन बैठक छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच संपन्न होऊन, या बैठकीत विभागीय अध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी तर उपाध्यक्षपदी संपादक अनिता वानखडे यांची एक मताने निवड झाली माहितीचा अधिकार सुदृढ करणे, भ्रष्टाचार प्रतिबंध करणे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काम करणाऱ्या संस्था संघटनांचे प्रतिनिधी हे खरे लोकसेवक व लोकप्रतिनिधी असतात आणि संविधान प्रमाणे या देशाचे मालक असून असंघटितपणामुळे अस्तित्वहीन आहेत. म्हणून या सर्व सामाजिक कार्य करणाऱ्या




सेवाभावी मान्यता असलेल्या संघटना एकत्र येऊन फेडरेशन स्थापन झाले. या फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश लोखंडे मुंबई तर सचिव विठोबा द्यानद्यान नाशिक हे आहेत. या फेडरेशनची नागपूर, अमरावती विभागीय बैठका संपन्न झाल्यानंतर नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय प्रतिनिधींची चिंतन बैठक सुरेश लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या चिंतन बैठकीत फेडरेशन स्थापन करण्याचा हेतू सांगताना अध्यक्ष लोखंडे म्हणाले बहुसंख्य नोकरवर्ग संघटितपणे बेकायदेशीर कृत्य बिनधास्तपणे करीत आहे. या परिस्थितीला कायदेशीर मार्गाने हाताळण्यासाठी योग्य विचार विनिमय प्रत्यक्ष होणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित विषयांवर काम करणाऱ्या संस्था संघटना यांचे जबाबदार प्रतिनिधी व अभ्यासक यांचे करिता विभागीय एक दिवशीय चिंतन बैठक घेण्याचे ठरवले. व ही तिसरी विभागीय चिंतन बैठक छत्रपती संभाजीनगर मधील गांधी भवन येथे संपन्न झाली. या बैठकीत उपस्थित संस्था प्रतिनिधींनी आपले कार्य, विचार व कार्य करताना येत असलेल्या अडचणी सांगितल्या. याच बैठकीत विभागीय कार्यकारिणी व जिल्हास्तरीय कार्यकारणी अध्यक्ष सुरेश लोखंडे यांनी जाहीर करून नियुक्तीपत्र दिले. छत्रपति संभाजीनगर विभागीय अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी नांदेड यांची एक मताने निवड झाली. उपाध्यक्ष अनिता वानखडे, सचिव राजाभाऊ पवार, तर सदस्य पदी संतोष खाजिना व आम्रपाली साबळे यांची निवड झाली. तसेच जिल्हाध्यक्ष पदी निवड करताना बीड जिल्हा अध्यक्षपदी मुकुंद ताटे, परभणी जिल्हाध्यक्ष किरण चक्रपाणी,व धाराशिव त्र्यंबकेश्वर मुंडे यांची निवड होऊन उर्वरित जिल्हाध्यक्ष लवकरच नियुक्त होतील असे त्यांनी जाहीर केले. आजच्या या चिंतन बैठकीस फेडरेशनचे सचिव विठोबा द्यानद्यान, कार्यकारी सदस्य राजकुमार कांबळे, गणेश लाड अल्ताफ खान आदी सह बऱ्याच सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधींची उपस्थिती होती.




## सिल्लोड पंचायत समितीमध्ये 'तंबाखूमुक्ती'चा निर्धार

### अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली सामूहिक शपथ

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड :** - सार्वजनिक आरोग्य व व्यसनमुक्त समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या 'तंबाखूमुक्त अभियान' अंतर्गत, येथील पंचायत समिती कार्यालयात नुकताच सामूहिक शपथ ग्रहण कार्यक्रम पार पडला. गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समितीतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तंबाखू व तत्सम पदार्थांच्या सेवनापासून दूर राहण्याची शपथ घेतली.



प्रशासकीय शिस्त आणि कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. यावेळी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी पगार यांनी सांगितले की, व्यसनमुक्त जीवन हीच सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. शासकीय कार्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतः व्यसनमुक्त राहून समाजासमोर एक आदर्श निर्माण करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक गावंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नासेर खान, कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी, विस्तार अधिकारी (पंचायत) साहेबराव शेळके, राधाकिसन चौधरी, विस्तार अधिकारी (कृषी) जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे, विश्वास बनसोडे, सहाय्यक लेखा अधिकारी उमेश मिसाळ, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) गट समन्वयक केशवकांत बुलबुले यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने तंबाखूमुक्त अभियानात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जासई हायस्कूलमध्ये नवीन इमारतीचे भूमिपूजन संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनिअर कॉलेज जासई या विद्यालयात शनिवार दि. २८/०३/२०२६ रोजी नवीन इमारतीचे भूमिपूजन संपन्न झाले या कार्यक्रमासमयी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा खासदार रामशेठ ठाकूर साहेब ,जे एम म्हात्रे साहेब, महेंद्र शेठ घरत साहेब, सुधीर घरत साहेब, रवी पाटील साहेब, तसेच विद्यालयाचे चेअरमन अरुण शेठ जगे साहेब, सुरेश पाटील साहेब, डी आर ठाकूर साहेब, गावचे सरपंच संतोष घरत साहेब, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ के जी म्हात्रे मॅडम , उपमुख्याध्यापक श्री कुटे सर शाळेच्या पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम तसेच पंचक्रोशीतील मान्यवर व शिक्षण प्रेमी,सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम मा खासदार मॅनेजिंग कौन्सलिंग चे सदस्य श्री रामशेठ ठाकूर साहेब व इतर उपस्थित मान्यवरांनी प्रतिमा पूजन केले. तदनंतर श्री रामशेठ ठाकूर साहेबांनी भूमिपूजन केले. त्यानंतर शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत



केले. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकानंतर महेंद्र शेठ घरत साहेबांनी मनोगत व्यक्त केले .त्यानंतर सुरेश पाटील साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा खासदार मॅनेजिंग कौन्सलिंग चे सदस्य श्री रामशेठ ठाकूर साहेब यांनी अध्यक्ष भाषण केले. शेवटी घरत मॅडम यांनी थोर देणगीदारांचे व सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानून हा कार्यक्रम अध्यक्षांच्या वतीने संपन्न झाला असे जाहीर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गाताडी सर व श्रीमती घरत एम के मॅडम यांनी केले.

# “बोचरे दांपत्याचा प्रेरणादायी उपक्रम: देवगावात विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप”

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड तालुक्यातील देवगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळावी आणि कोणतेही मूल आवश्यक साहित्याअभावी शिक्षणापासून वंचित राहू नये या उदात्त हेतूने एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. प्रा. अभिषेक बोचरे आणि भाग्यश्री बोचरे या दांपत्याच्या पुढाकारातून शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमांतर्गत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजेनुसार साहित्य वितरित करण्यात आले. लहान मुलांच्या शिक्षणाच्या पायाभरणीसाठी इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांना पाट्या देण्यात आल्या. तिसरीच्या विद्यार्थ्यांना लेखनाचा सराव सुलभ व्हावा यासाठी पॅड देण्यात आले, तर चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांना गणित व भूमितीचे ज्ञान





अधिक चांगल्या प्रकारे आत्मसात करता यावे यासाठी कंपास बॉक्स देण्यात आले. साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, समाधान आणि उत्साह हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला.

कार्यक्रमाला गावातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश गव्हाणे, शिक्षणतज्ज्ञ भागवत बोचरे, संतोष घाडगे, समिती सदस्य फिरोज शेख, शिवप्रसाद गव्हाणे, धनंजय जोशी, तसेच एकता मित्र मंडळाचे अध्यक्ष रेवणसिद्ध लोहारकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. याशिवाय मुख्याध्यापक लहानू गावडे, सार्थक बोचरे, सोमनाथ पोटे, सचिन कुलथे, नवनाथ चव्हाण, राहुल बोचरे, सतीश लोहारकर आदींची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, “विद्यार्थी हा देशाचा कणा असून त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना योग्य साधनसामग्री उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि कोणतेही मूल केवळ साधनांच्या अभावामुळे मागे राहू नये, हा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे.”

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक लहानू गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी मोठी मेहनत घेतली. नवनाथ सुरवाडे, संदीप बोरसे, उज्वला देशमुख, नूतन शेटे, विद्या बडे, देवयानी साळी, नीता वायळ यांनी नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे आभार मानले. या उपक्रमामुळे केवळ विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य मिळाले नाही, तर त्यांच्यात शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला आहे. संपूर्ण परिसरात या सामाजिक उपक्रमाचे कौतुक होत असून, अशा प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेला निश्चितच बळ मिळेल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# चोरंबा येथील खंडेश्वर पालखीच्या मिरवणुकीत भंडाऱ्याची उधळण नवस फेडण्यासाठी अंगावरून पालखी घेण्याची प्रथा ;'येळकोट-येळकोट जय मल्हार' गजर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** अर्धापूर तालुक्यातील चोरंबा (ना.) येथील श्री खंडेश्वर देवस्थान जेजुरी प्रतिष्ठान यात्रेला रविवारपासून उत्साहात प्रारंभ झाला. ३० मार्च रोजी श्री खंडेश्वराची पालखी मिरवणूक भक्तिभावाने पार पडली. पालखी श्री खंडेश्वर मंदिरातून निघून संपूर्ण गावातून काढण्यात आली. नवस फेडण्यासाठी अनेक भाविक पालखीच्या समोर झोपतात. यानंतर ही पालखी त्यांच्या अंगावरुन जाते. ही परंपरा अनेक वर्षापासूनच येथे सुरु आहे. ही यात्रा पाच दिवस चालते. पालखी दरम्यान



पिवळ्या भंडाऱ्याची उधळण भाविकांकडून करण्यात आली. भंडाऱ्याच्या उधळणीमुळे संपूर्ण परिसर पिवळ्या रंगाने न्हाऊन निघाला होता. तसेच 'येळकोट येळकोट जय मल्हार' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

रखरखत्या उन्हात नवस फेडण्यासाठी अनेक भाविक रस्त्यावर झोपले होते. त्या भाविकांच्या अंगावरून पालखी पुढे नेण्यात आली. या पालखी दर्शनासाठी नांदेड, हिंगोली, परभणी जिल्ह्यांसह पंचक्रोशीतील

लाखो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेंडीने गाड्या ओढण्याची प्रथा...

पालखी मिरवणूक पूर्ण झाल्यानंतर पालखी माळावरच्या श्री खंडेश्वर देवस्थानकडे प्रस्थान करण्यात आली. यात्रेच्या निमित्ताने पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांसह स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी भाविकांनी शेंडीने गाड्या ओढून आपली श्रद्धा व्यक्त केली. अनेक भाविकांनी या अनोख्या परंपरेत सहभाग नोंदविला.

शेकडो वर्षांची परंपरा आजही कायम... चोरंबा येथील श्री खंडेश्वर देवस्थान यात्रेची शेकडो वर्षांची परंपरा आजही कायम आहे. या यात्रेदरम्यान ग्रामस्थ बारा दिवस गावची शिव ओलांडत नाहीत. या काळात शेतीची कामे बंद ठेवली जातात. तसेच घरामध्ये चटणी, मिरची दळणे, दळण आदी कामेही केली जात नाहीत.

## स्वच्छतेत सावखेडा बुद्रुक-खुर्दचा जिल्ह्यात डंका

# संत गाडगेबाबा अभियान: जिल्हास्तरीय समितीतून 'तृतीय' क्रमांक जाहीर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर सिल्लोड :-**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीने आपला निकाल जाहीर केला असून, यात सिल्लोड तालुक्यातील सावखेडा बुद्रुक-खुर्द ग्रामपंचायतीने जिल्ह्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश मिळवले आहे. या यशामुळे संपूर्ण तालुक्यातून ग्रामपंचायतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित (IAS), पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ओमप्रकाश रामावत आणि गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली सावखेडा गावांनी स्वच्छतेत आदर्श निर्माण केला. लोकसहभागातून राबवलेला 'सावखेडा पॅटर्न' या अभियानात यशस्वी ठरला.

हे यश मिळवण्यासाठी सरपंच काशिनाथ गोरे, उपसरपंच प्रभाकर गोंगे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी विलास ढेंगे आणि सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून गावाला नवीन कलाटणी देऊन एक 'आदर्श ग्राम' घडवण्याचा प्रयत्न या चमूने यशस्वी केला आहे.जिल्ह्यात बाजी मारल्यानंतर आता ही ग्रामपंचायत विभाग स्तरावर देखील आपला नावलौकिक करेल, असा विश्वास प्रशासकीय स्तरावरून व्यक्त करण्यात आला आहे. तालुक्यातील इतर गावांनी देखील सावखेडाचा आदर्श घेऊन शासकीय योजनांत अव्वल यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एक कोटी पन्नास हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** शेअर्स ट्रेंडिंग मध्ये केलेल्या गुंतवणूक वर जास्त परतावा देण्याचे आमिष दाखवून एक कोटी पन्नास हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमाविरोधात सायबर पोलीस ठाण्यात 27 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.राकेश कुर्मी हे नवीन पनवेल, सेक्टर सहा येथे राहत असून त्यांनी टेलिग्राम मध्ये जाहिरात लिंक पाहिली. यावेळी शेअर मार्केटमध्ये भरघोस नफा देण्याबाबत दर्शवण्यात आले होते. त्यांनी लिंक वर क्लिक केले असता ते व्हाट्सअप ग्रुपला जॉईन झाले. यावेळी ग्रुप वर नफ्याबाबत माहिती दिली जात होती. राकेश यांनी पन्नास हजार रुपये डिपॉझिट केले आणि शेअर्समध्ये पैसे गुंतवणूक केल्याने त्यांना नफा होत होता. त्यामुळे त्यांनी अधिक पैशांचे गुंतवणूक केली आणि शेअर्स विकत घेतले. त्यांनी एक कोटी पन्नास हजार रुपये भरल्यानंतर वेगवेगळे आयपीओ देण्यात आले आणि नवीन आयपीओ विकत घेतल्यानंतरच त्यांच्या खात्यात रक्कम देण्यात येत होती. त्यांची रक्कम अगोदर घेतलेला आयपीओ मध्ये गुंतून राहिल्याने त्यांनी ती मिळण्यासाठी विनंती केली. नवीन आयपीओसाठी आणखी 90 लाख रुपये भरण्यास सांगितले. मात्र त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी ते भरण्यास नकार दिला आणि फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# पोलीस ठाणे नंदनवन, नागपूर शहर येथे दाखल झालेल्या गुन्ह्याची धक्कादायक माहिती !

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** नागपूर शहरातील पोलीस ठाणे नंदनवन येथे अप.क्र. ५९२/२०२५ कलम १११ भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्ह्यात १०९(१),३५१(३)२९६, ३(५)वाढ करण्यात आली आहे. या गुन्ह्यात चार आरोपींचा समावेश आहे, ज्यांनी समाजात दहशत निर्माण केली आहे.

आरोपींची नावे:

१) संकेत गुलाबराव वंजारी, वय २४ वर्षे, ईडब्ल्यूएस क्वॉर्टर, नंदनवन नागपूर.

२) वैभव अशोक तन्नेलवार, वय ३४ वर्षे, बृंदावन नगर, नागपूर.

३) तुषार उर्फ तांबा दिलीपराव पळसापुरे, वय २५ वर्षे, ईडब्ल्यूएस क्वॉर्टर, नंदनवन, नागपूर.

४) देवेंद्र बारापात्रे, वय २४ वर्षे, लालगंज, दही बाजार, नागपूर.

या चारही आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद चारही आरोपी हे संघटितपणे एकत्रित येऊन त्यांनी पोलीस ठाणे वाठोडा, पोलीस ठाणे नंदनवन ,पोलीस ठाणे कन्हान नागपूर ग्रामीण मध्ये अनेक शरीराविरुद्ध व मालमत्तेविरुद्ध गुन्हे दाखल केलेले असून त्याची शहरात दहशत निर्माण केलेली आहे.वरील चारही आरोपींची कृत्य हे कलम 111 भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये गुन्हा दाखल होत असल्याने चारही आरोपींची गुन्हे अभिलेख पडताळून गुन्ह्यात वाढ करणे बाबत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ कमांक-४, नागपूर शहर यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता पोलीस उपायुक्त परिमंडळ चार क्रमांक चार यांनी या गुन्ह्यात वाढ करण्याची मंजुरी दिलेली आहे, आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. पोलीस ठाणे नंदनवनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी या गुन्ह्याची माहिती प्रसिद्ध केली असून, समाजात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीसांकडून कडक कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे.या गुन्ह्याची तपासणी नजीकच्या काळात सक्रीय गुन्हेगारी टोळ्यांवर अशीच कारवाई करण्याचा पोलीसांचा मानस आहे.


# अजिंठा डोंगररांगेत 'ज्ञानवृक्षांचा' नैसर्गिक वारसा

## जैन-बौद्ध परंपरेतील २९ दुर्मिळ प्रजातींचे अस्तित्व उघड; डॉ. संतोष पाटील यांचे संशोधन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड :-**जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा डोंगररांगा केवळ प्राचीन लेण्यांच्या सौंदर्यासाठीच नव्हे, तर दुर्मिळ वनसंपदेसाठीही 'निसर्गसंपन्न' असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जैन धर्मातील २४ तीर्थंकर आणि बौद्ध परंपरेतील २८ बुद्ध यांना ज्या विविध वृक्षांखाली ज्ञानप्राप्ती झाली, त्यापैकी तब्बल २९ प्रजातींच्या वृक्षांचा नैसर्गिक अधिवास अजिंठा डोंगररांगेत आढळला आहे. सिल्लोड येथील पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी केलेल्या प्रदीर्घ वनाभ्यासातून हे महत्त्वपूर्ण संशोधन समोर आले आहे.

विशेष म्हणजे, या वृक्षांचे हुबेहूब चित्रण अजिंठ्याच्या जगप्रसिद्ध चित्रशैलीत (विशेषतः लेणी क्रमांक १६) पाहायला मिळते. लेणी क्र. १६ मधील 'छदम जातक' कथेत पळस, नागकेशर, पिंपळ व बांबूचे 'वेणू बन'



इत्यादी वृक्ष चित्रित आहेत. ऐतिहासिक पुराव्यांनुसार, भगवान श्रीकृष्णांनी गीतेत ज्या पिंपळ वृक्षाला सर्वश्रेष्ठ मानले, तोच वृक्ष जैन व बौद्ध धर्मातही 'बोधी' किंवा 'चैत्य' वृक्ष म्हणून वंदनीय आहे. एकूण ४८ प्रमुख वृक्षांपैकी २९ वृक्षांच्या प्रजातींचे अस्तित्व एकट्या अजिंठा डोंगररांगेत डॉ. पाटील यांना संशोधनादरम्यान दिसून आले आहे.

**'पाटला' आणि 'वरून' वृक्षांचे अस्तित्व धोक्यात**

> **"अजिंठा डोंगररांगेतील हे नैसर्गिक संचित जपण्यासाठी वन विभाग आणि प्रशासनाने विशेष पावले उचलणे गरजेचे आहे. नागकेशर व कदंब हे वृक्ष येथे वन्य स्थितीत नाहीत, मात्र मुर्डेश्वर मंदिर परिसरात त्यांचे देवस्थान म्हणून जतन केले आहे. या वृक्षांचे लेण्यांशी असलेले नाते पर्यटनासाठी नवा पैलू ठरू शकते."**
>
> **— डॉ. संतोष पाटील (पर्यावरण अभ्यासक, सिल्लोड)**

सम्राट अशोकाची राजधानी असलेल्या 'पाटलीपुत्र' शहराचे नाव ज्या वृक्षावरून पडले, तो 'पाटला' (Stereospermum chelonoides) हा बोधी वृक्ष गौताळा अभयारण्यात केवळ दोन ठिकाणी आढळला आहे. हा वृक्ष 'IUCN' च्या जागतिक लाल यादीत 'संकटग्रस्त' म्हणून नोंदवला गेला आहे. तसेच, पाचवे बुद्ध 'रेवत' यांचा बोधीवृक्ष समजला जाणारा 'वरून' (Crateva religiosa) हा अत्यंत दुर्मिळ वृक्ष केळगाव घाटाच्या परिसरात आढळला असून, याची केवळ ८ ते ९ झाडेच शिल्लक आहेत.

वृक्षांचा अधिवास (संशोधनानुसार):

जैन चैत्य वृक्ष: वड (ऋषभनाथ), सेमल-काटेसावर (अजितनाथ), शिरीष (सुपार्श्वनाथ), बेहडा (पुष्पदंत), टेम्भूर्णी (श्रेयांशनाथ व कुंथूनाथ), पाटला (वासुपूज्य), जांभूळ (विमलनाथ), पिंपळ (अनंतनाथ), गोकर्ण (धर्मनाथ), आंबा (अर्हननाथ), बकुळ (नेमीनाथ) व धावडा (पार्श्वनाथ).बौद्ध बोधी वृक्ष: पळस (मेधनकारा), पिंपळी (दीपंकारा), अर्जुन (अनोमदस्सी), बांबू (सुजाता), सोनसावर (सिद्धत्थ), आसना (तिस्सा), आवळा (फुस्सा), पाटला (विपस्सी), आंबा (सीखी), शिरीष (काकसंधा), वड (कुस्सप), पिंपळ (तथागत गौतम बुद्ध) व उंबर (कोनागामना).

# तुकाराम महाराज पालखी महामार्ग ड्रेनेज बांधकाम व सफाई रखडल्याने मच्छरांचा प्रकोप वाढला

## सणसरात घाणीचा विळखा;नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**सणसर —विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर येथे बऱ्याच महिन्यापासून बंद ठेवण्यात आलेल्या संत तुकाराम पालखी महामार्ग प्रशासन व ठेकेदार यांच्या दुर्लक्षामुळे सणसर येथील गावकऱ्यांचे जीवन अक्षरशः नरकयातना भोगत आहे.अर्धवट सोडलेल्या ड्रेनेजचे बांधकाम,गटारांची न झालेली सफाई आणि साचलेले घाण पाणी यामुळे मच्छरांचा प्रकोप इतका वाढला आहे की लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गावातील महामार्ग लगतच्या मातांनी सांगितले की,"आमच्या लेकरांना तापाने फडफडताना पाहणे असह्य झाले आहे."तर ज्येष्ठ नागरिकांनी हळहळ व्यक्त करत म्हटले,"आम्ही आयुष्यभर गावाच्या प्रगतीसाठी झटत आलो, पण आज पालखी महामार्ग प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आमचे आरोग्य धोक्यात आले आहे."

सणसर ग्रामपंचायतने संत तुकाराम महाराज पालखी महामार्गच्या पंढरपूर येथील कार्यालयात वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.औषध फवारणी न झाल्याने मच्छरांचे साम्राज्य दिवसेंदिवस वाढत असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सणसरवासीयांनी पालखी महामार्ग प्रशासनाला आर्त हाक दिली आहे"तातडीने स्वच्छता मोहीम राबवा,गटारांची सफाई व दुरुस्ती करा,अन्यथा आमचे जीवन संकटात ढकलले जाईल."

दरम्यान,१० एप्रिल रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी येणार असल्यामुळे सणसर ग्रामस्थ गडकरी यांना भेटणार असून पालखी महामार्गचे अधिकारी व ठेकेदार यांच्या विरोधात निवेदन देणार असून तातडीने कारवाई न झाल्यास सामूहिक आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# महेश साखर कारखान्यातील कोट्यवधींची मशिनरी चोरीला; माजी आ.भीमराव धोंडे यांचा मोठा गौप्यस्फोट

## संशयितांची नावे निष्पन्न,लवकरच गुन्हे दाखल होणार

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे :** आष्टी तालुक्याची 'कामधेनू' असा लौकिक असलेला आणि अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेला कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा एकदा सुरू करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र,शेतकऱ्यांच्या या आशादायी चित्राला गालबोट लावणारी एक अत्यंत धक्कादायक घटना आता समोर आली आहे. कारखान्याच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असतानाच, आवारातून तब्बल कोट्यवधी रुपयांच्या मशिनरीची चोरी झाली आहे.या प्रकरणातील संशयितांची नावे निष्पन्न झाली असून, लवकरच याप्रकरणी पोलिसांत रीतसर गुन्हे दाखल केले जातील असा मोठा गौप्यस्फोट माजी आ.भीमराव धोंडे यांनी केला आहे.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात बुधवारी दि.१ एप्रिल आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी अशोक साळवे उपस्थित होते.माजी आ.धोंडे यांनी महेश कारखान्याच्या उभारणीचा, आतापर्यंत



आलेल्या संकटांचा आणि सद्यस्थितीचा सविस्तर आढावा पत्रकारांसमोर दिला. अडचणींचा डोंगर पार करत कारखाना अंतिम टप्प्यात माजी आ. धोंडे यांनी माहिती देताना सांगितले की,आष्टी आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी व स्थानिक अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी महेश सहकारी साखर कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला. या संपूर्ण प्रवासात अनेक मोठी आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक संकटे उभी राहिली.परंतु, या सर्व अडथळ्यांवर यशस्वीपणे मात करून आता कारखान्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या गाळप हंगामात कारखान्याचे धुराडे पेटलेले दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या प्रकल्पामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर वाहतूकदार, पूरक उद्योग (Ancillary) आणि स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प तालुक्याच्या अर्थचक्राला मोठी गती देईल, असेही ते म्हणाले.

कोट्यवधींच्या चोरीने खळबळ; सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह

कारखान्याचे काम अत्यंत वेगात आणि सकारात्मक वातावरणात सुरू असतानाच अज्ञात चोरट्यांनी कारखान्याच्या महागड्या मशिनरीवर डल्ला मारल्याची गंभीर बाब माजी आ. धोंडे यांनी उघड केली. ही चोरी काही हजारांची नसून थेट कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे.विशेष म्हणजे, या चोरीतील संशयितांची नावे आता समोर आली आहेत. त्यांच्यावर लवकरच पोलिसांत कठोर कारवाईसाठी अधिकृत तक्रार दाखल केली जाणार आहे.

या मोठ्या चोरीमुळे कारखान्याच्या उभारणीच्या गतीवर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता असली,तरी नियोजित वेळेतच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि सर्व संबंधित यंत्रणा शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे माजी आ. धोंडे यांनी स्पष्ट केले.दरम्यान,

एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत जड असलेली मशिनरी चोरीला गेल्याने कारखान्याच्या अडचणी वाढल्या आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई व्हावी अशी मागणी संचालक मंडळ, शेतकरी आणि नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

चोरी झाली तरी 'कारखाना सुरू होणारच' माजी आ.धोंडे यांचा निर्धार

महेश सहकारी साखर कारखाना ही या भागातील शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही आतापर्यंत अनेक संकटे झेलली आहेत. आता या चोरीच्या प्रकाराने आम्ही अजिबात खचणार नाही.आमचा निर्धार पक्का असून, कोणत्याही परिस्थितीत येणाऱ्या हंगामात गाळप सुरू करून शेतकऱ्यांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करूच असा विश्वास माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.

## पनवेल तालुक्यातील शिरढोण गावचे लोकप्रिय सूत्रसंचालक दिलीप भोपी यांचा नावलौकिक वाढता

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तालुक्यातील विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक समारंभांमध्ये आपल्या खास निवेदनशैलीने उपस्थितांची मनं जिंकणारे शिरढोण (ता. पनवेल) येथील दिलीप गोमा भोपी हे सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहेत. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मभूमीत वाढलेले भोपी यांनी आपल्या कष्ट, जिद्द आणि वक्तृत्वकलेच्या जोरावर समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

घरची परिस्थिती साधारण असतानाही त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि आपल्या अंगी असलेल्या वक्तृत्वकलेचा उपयोग समाजासाठी करण्याचा ध्यास घेतला. सुरुवातीला क्रिकेट सामन्यांमध्ये समालोचन करत त्यांनी आपल्या आवाजाची आणि शब्दांची जादू दाखवली. त्यानंतर हळूहळू त्यांनी साखरपुडा, विवाह सोहळे, वाढदिवस तसेच दुःखद प्रसंगी श्रद्धांजली कार्यक्रमांमध्येही प्रभावी निवेदन करून स्वतःचे स्थान निर्माण केले. पनवेल तालुक्यासह,नवी मुंबई आजूबाजूच्या पंचक्रोशीतील गावांमध्ये होणाऱ्या मोठ्या कार्यक्रमांमध्ये दिलीप भोपी यांना विशेष निमंत्रण असते. त्यांच्या गोड आवाजात आणि प्रभावी शैलीत मान्यवरांचे स्वागत, परिचय आणि कार्यक्रमाचे सुसूत्र नियोजन हे त्यांचे वैशिष्ट्य मानले जाते. विशेष म्हणजे, स्थानिक राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची नावे त्यांना तोंडपाठ असल्याने ते समोरच्या व्यक्तीला ओळखून तत्काळ त्यांचे नाव पुकारून स्वागत करतात.



निवेदनाबरोबरच गायनाचीही त्यांना उत्तम आवड आहे. मराठी आणि हिंदी गाण्यांमधून ते प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. त्यामुळे एकाच वेळी निवेदक आणि गायक अशी दुहेरी ओळख त्यांनी निर्माण केली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांची नम्रता. यशाच्या शिखरावर पोहोचत असतानाही त्यांच्यात कोणताही गर्व नाही. सहनिवेदकांशी आदराने वागणे, प्रत्येक व्यक्तीला मान देणे आणि साधेपणाने संवाद साधणे हे त्यांचे विशेष गुण आहेत. त्यामुळेच ते सर्वसामान्यांपासून मान्यवरांपर्यंत सर्वांच्या मनात घर करून आहेत. पनवेल तालुक्यातील या गुणी कलाकाराचा नावलौकिक दिवसेंदिवस वाढत असून, भविष्यातही त्यांच्या कलेचा झेंडा अधिक उंचावेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

## नागपूर मध्यवर्ती कारागृहातील महिला बंदयांसाठी हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** "सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे महिला बंदयांसाठी पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत "हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे" आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाकरीता कारागृहातील 80 महिला बंदयांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षणादरम्यान महिला बंदयांनी फेब्रिक पाऊच, टोट बॅग, क्ले ज्वेलरी, वारली पेंटींग व क्ले पेपर वेट इत्यादी सुबक व आकर्षक वस्तु तयार केल्या. महिला बंदयांनी तयार केलेल्या सदरच्या वस्तु कारागृहाचे विक्री केंद्रामध्ये विक्रीकरीता ठेवण्यात आल्या होत्या. सदर वस्तुंची मोठया प्रमाणात



विक्री झालेली असुन कारागृहाचे उत्पन्नात भर पडली आहे.बंदयांनी तयार केलेल्या वस्तु समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच कारागृहातुन बंदी मुक्त झाल्यानंतर स्वत:चे व कुटुंबाचे पालन-पोषण करण्यासाठी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी कारागृहात बंदयांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते.पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षण यश्स्वीरित्या पुर्ण केलेल्या कारागृहातील महिला बंदयांना आज दिनांक 31.03.2026 रोजी प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरीता कारागृह अधीक्षक श्री. वैभव सु. आगे, अतिरीक्त अधीक्षक, श्रीमती दिपा आगे, प्रमुख पाहुणे ॲड. गणेश खानझोडे, उच्च न्यायालय, नागपूर, ॲड. कौस्तुभ लुले, ॲड. गौरव खोंड, पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेच्या प्रशिक्षक श्रीमती प्राजक्ता जोगळेकर, यांचे हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरीता श्री. श्रीधर काळे, उपअधीक्षक, श्री. आनंद पानसरे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. वामन निमजे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. नितीन क्षिरसागर, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. भिमराव राऊत, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, श्रीमती दुर्गा शहारे, हवालदार व इतर महिला कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वाती भगत, शिक्षिका व आभार प्रदर्शन श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, यांनी केले.

## के एल इ कॉलेज ऑफ लॉ, कळंबोली येथे वार्षिक विधी महोत्सव स्पार्कल 7.0 चे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** के एल इ सोसायटी, के एल इ कॉलेज ऑफ लॉ, कळंबोली यांनी २७ ते २९ मार्च २०२६ दरम्यान त्यांच्या वार्षिक विधी महोत्सव स्पार्कल 7.0 चे यशस्वी आयोजन केले. देशभरातील नामांकित विधी महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेल्या या तीन दिवसीय महोत्सवाने विधी क्षेत्रातील अनुभवाधारित शिक्षण, वकिली कौशल्ये आणि व्यावसायिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मूट कोर्ट स्पर्धेत ४४ संघांनी तर क्लायंट काउन्सेलिंग स्पर्धेत २० संघांनी सहभाग नोंदवला. देशातील विविध प्रतिष्ठित विधी संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या १८० हून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. या दोन्ही स्पर्धा प्रत्यक्ष जीवनातील कायदेशीर परिस्थितींचे अनुकरण करत विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी आयोजित करण्यात आल्या होत्या.

न्यायमूर्ती विश्वनाथ व्ही. अंगडी (माजी जिल्हा न्यायाधीश व माजी प्राचार्य, सिटी



सिव्हिल आणि सत्र न्यायालय, कर्नाटक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ते समारोप समारंभालाही उपस्थित होते यावेळी अमिटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. ए. डब्ल्यू. संतोष कुमार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. थुरैराजा, बॉम्बे हायकोर्टचे न्यायमूर्ती श्रीराम शिर्साट तसेच कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. ए. पाटील यांनी उपस्थित राहून अंतिम फेरीचे परीक्षण केले. न्यायमूर्ती एस. थुरैराजा यांनी महोत्सवाच्या उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये दिसणारा उत्साह आणि आनंद अधोरेखित केला. त्यांनी शैक्षणिक अभ्यासाबरोबरच सहशैक्षणिक उपक्रमांचे महत्त्वही स्पष्ट केले. न्यायमूर्ती बी. ए. पाटील यांनी विधी क्षेत्रातील बदलांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. मा. न्यायमूर्ती विश्वनाथ व्ही. अंगडी यांनी कार्यक्रमाच्या नियोजनाचे कौतुक करत भविष्यात या महोत्सवात ३०० पेक्षा अधिक महाविद्यालयांचा सहभाग होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मूट कोर्ट स्पर्धेत व्ही इ एस कॉलेज ऑफ लॉ यांनी उत्कृष्ट संशोधन, मांडणी व युक्तिवादाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. तर क्लायंट काउन्सेलिंग स्पर्धेत अलायन्स युनिव्हर्सिटी यांनी प्रभावी संवाद कौशल्ये आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेच्या आधारे विजेतेपद मिळवले.

या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तर्कशक्ती, न्यायालयीन कौशल्ये आणि व्यावसायिक नैतिकता विकसित करण्याची संधी मिळाली.

तसेच देशभरातील विधी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची मौल्यवान संधीही उपलब्ध झाली, ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासाला नवी दिशा मिळाली.

## नेरूळ–बेलापूर अंनिसची भोंदूगिरीविरोधात प्रभात फेरी; नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

**नवी मुंबई :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नेरूळ आणि बेलापूर शाखेच्या वतीने बुधवारी (1 एप्रिल 2026) नेरूळ येथील ज्वेल गार्डन परिसरात भोंदू बाबा खरात यांच्या विरोधात जोरदार प्रभात फेरी काढण्यात आली.




हातात निषेधाचे फलक, अंधश्रद्धेविरुद्ध संदेश देणारी पत्रके आणि जागृतीपर घोषणाबाजी करत झालेली ही प्रभात फेरी अतिशय उत्साहात पार पडली. 500 ते 600 पत्रकांचे वाटप करण्यात आले असून नागरिकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेकांनी अंनिसच्या कामाबद्दल उत्सुकता दाखवत सहभाग नोंदवला.

या मोहीमेच्या यशस्वी आयोजनामध्ये रमेश साळुंखे सर यांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. फेरीत रमेश साळुंखे, बालाजी शिंदे, आशुतोष साळुंखे, सुनीता साळुंखे, सौरभ कुलकर्णी, आलोक देशपांडे, लेखा देशपांडे, त्रिशिला कांबळे, भास्कर पवार, डॉ. शेख, डॉ. रेणके, फुलचंद शिंदे, राजीव देशपांडे, वाघ, सचिन आदी कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.

अंनिसच्या वतीने अशीच प्रभात फेरी 2 एप्रिल रोजी सीबीडी बेलापूर येथे आणि 3 एप्रिल रोजी खारघर उत्सव चौकात आयोजित करण्यात येणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी दर्यापूर येथील इंजि. श्री रितेश वानखडे निवड

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** युवा नेतृत्वाला चलना देत पक्ष संघटन बळकट करण्याच्या दृष्टीने इंजि. रितेश दादा वानखडे यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने यांच्यावर दाखवलेला विश्वास हा त्यांचा सतत्यपूर्ण कामगिरीची पावती मानली जात आहे.

इंजि. रितेशदादा वानखडे हे गेल्या



अनेक वर्षापासून युवकांमध्ये कार्यरत करत असून विविध सामाजिक उपक्रम, संघटनात्मक कामे आणि जनतेच्या प्रश्नासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर हि महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या निवडीबद्दल तालुक्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते पदाधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. युवकांना बरोबर घेऊन पक्ष अधिक सक्षम करण्याचा निर्धार त्यांनी

व्यक्त केला आहे. दरम्यान आगामी काळात युवक काँग्रेसच्या माध्यमातून विविध लोकहिताचे उपक्रम राबवून जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. माझी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर. खासदार श्री बळवंत वानखडे. माझी आमदार श्री रवींद्र जगताप जिल्हा अध्यक्ष श्री बबलू भाऊ देशमुख दर्यापूर तालुका अध्यक्ष श्री सुधाकर भारसाकळे यांच्या मार्गदर्शनात युवक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री शिवराज मोरे यांनी ही निवड केली.

## महाराष्ट्र शासनाने सुधारीत निवृत्ती वेतन योजनेचा विकल्प देण्यास ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ

**दैनिक युवक आधार**

**अतुल गोडांने चादुर रेल्वे प्रतिनिधी :** राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचार्यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन १९८२ प्रमाणे जुनीच पेन्शन योजना लागू करावी यासाठी सरकारी निमसरकारी ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे नेतृत्वात मार्च 2003 मध्ये ७ दिवसाचा ऐतिहासिक संप झाला. या संपाच्या पार्श्वभूमीवर शासनाने १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती अंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी दिनांक 20 सप्टेंबर 2024 चे शासन निर्णय नुसार सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना दिनांक १मार्च २०२४ पासून लागू केली आहे. या योजनेसाठी पात्र व इच्छुक असलेल्या कर्मचार्यांना या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी एक वेळचा विकल्प दि. 31 /3/ 2025 पर्यंत देण्यास मुदत देण्यात आली. तसेच या योजनेच्या अटी व शर्ती विहित करणे, योजनेची अंमलबजावणी करणे, योजनेचे नियम व कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी वित्त विभागास प्राधिकृत करण्यात आली आहे. तथापि गेल्या दोन वर्षापासून वित्त विभागाकडून स्पष्टीकरणात्मक अधिसूचना अद्यापही जाहीर करण्यात आली नाही. त्यामुळे या योजनेची स्पष्टता नसल्याने योजनेचा स्वीकार कसा करावा याबाबत कर्मचारी संभ्रमात आहेत. राज्य शासनाची मात्र सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना बाबत चालढकल सुरू आहे. याबाबत संघटने कडून शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे. वेळप्रसंगी सनदशीर मार्गाने लक्षवेध आंदोलन केले.मागील वर्षी संघटनेच्या पाठपुरामुळे 31/3/2026 पर्यंत विकल्प देण्यास मुदतवाढ देण्यात आली होती तथापि अद्यापही स्पष्टीकरणात्मक अधिसूचना शासनाने जाहीर केली नसल्याने कर्मचारी संभ्रमात आहेत. या संदर्भात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने समन्वय समितीचे नेतृत्वात सुधारित सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतनाचा स्पष्टीकरणात्मक अधिसूचना काढण्याचे मुख्य मागणीसह प्रलंबित प्रस्तावित मागण्या साठी दिनांक 21 एप्रिल 2026 पासून बेमुदत संप करण्याची नोटीस दिनांक 17 मार्च 2026 ला जिल्हाधिकारी मार्फत शासनाला दिलेली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन स्विकारण्यासाठी दि. ३०/०३/२०२६ चे शासन निर्णयानुसार दि. ३१/१२/२०२६ पर्यंतचे मुदतवाढ दिली असली तरीही जोपर्यंत सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतनाबाबत वित्त विभागाकडून स्पष्टीकरणात्मक अधिसूचना निघत नाही व ईतर प्रस्तावित मागण्यांवर शासन चर्चा करून निर्णय घेणार नसेल तर दिनांक 21 एप्रिल 2026 पासून चा बेमुदत संप अटळ असल्याचे समन्वय समितीचे निमंत्रक व जिल्ह्याचे सरचिटणीस पवार यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाराने कळविले आहे

# श्री क्षेत्र नारायणगड महाराष्ट्राचे भक्तिरुपी शक्तिकेंद्र - ज्ञानेश्वर महाराज पठाडे

## श्री नगदनारायण महाराजांचा जयघोष करत उमापूर येथे नारळी सप्ताहात भक्तांचा महापूर

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे:**महाराष्ट्रात सर्वत्र श्रीक्षेत्र नारायणगडाच्या मातीचा सुगंध दरवळत असून तेरा महान सिध्द ऋषीमुनींनी येथे साधना केलेली आहे. ती पावन भूमी आहे. संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराजांच्या भक्तीरुपी शक्तीने पंढरीचे पांडुरंग हे नारायणगडावर आलेले आहेत. ही भक्तीरुपी शक्तीची ताकद आहे. नगद नारायण महाराज थोर महात्मा तपस्वी साधू होते. त्यांच्या भक्तीरुपी सेवेचे तात्काळ फळ मिळते ही त्यांच्या नामाची ताकद आहे.महाराष्ट्राचे भक्तिरुपी शक्तिकेंद्र म्हणून श्रीक्षेत्र नारायणगडाचा उल्लेख होतो. अठरापगड जाती धर्मांच्या लोकांना सोबत घेवून नारायणगड आईच्या भूमिकेत काम करतो. शक्तीसाठी रायगड आणि भक्तीसाठी नारायणगड काम करतो गडावर आजही साक्षात भगवंत हे वास्तव्य करत आहेत हि नगद नारायण महाराजांच्या सेवेची ताकद आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध युवा कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांनी केले.




स्वानंद सुख निवासी संत कुलभूषण महात्मा श्री संत नगद नारायण महाराज यांच्या कृपेने गेवराई तालुक्यातील मौजे उमापुर येथे मंगळवार दि.३१ मार्च रोजी श्रीक्षेत्र नारायणगडाच्या ७४ व्या भव्य नारळी सप्ताहास संत-महंतांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला दरम्यान यावेळी पहिले कीर्तनरुपी पुष्प गुंफताना सुप्रसिद्ध युवा कीर्तनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पठाडे हे बोलत होते.यावेळी श्रीक्षेत्र नारायणगडाचे महंत प्रेममुर्ती ह.भ.प.शिवाजी महाराज, नामदेव म.शेकटेकर, उत्तराधिकारी संभाजी महाराज, शिवाजी म.गिरी, लक्ष्मण म.तकीक, हरि म.भोसले,शिवाजी म.भोसले यांच्यासह पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी त्यांनी जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पड़ता जड़ भारी | दासी आठवावा हरी ||१|| मग तो होऊ नेदी सीण | आड़ घाली सुदर्शन ||२|| नामाच्या चिंतने | बारा वाटा पळती विघ्ने ||३|| तुका म्हणे प्राण | करा देवासी अर्पण ||४|| या अंभगावर सुंदर असे चिंतन केले पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रत्येकाने भगवंताचे नामस्मरण करावे नामस्मरणाने संकट दूर होवून पुण्य प्राप्त होते. भगवंत भक्ताला संकटातुन बाहेर काढतात. जीवनात शांतीसाठी तुकोबांची गाथा वाचा एकमेकांना सहकार्य करा. पती-पत्नीने एकमेकांना आधार देत खंबीर साथ द्या. पैश्यामुळे भाऊ- भाऊचे नाते तोडू नका. स्त्री शक्तींवर टिका करु नका. त्यांना कमी लेखू नका. नारळी सप्ताहात चौवीस तास भजन आणि भोजन सुरु असते. महंत शिवाजी महाराज हे परिपूर्ण वारकरी आहेत सर्व समाजाला ते एकत्र घेवून चालतात. तर उत्तराधिकारी संभाजी महाराज हे तरुणांची फौज घेवून तरुणांची मोट बांधण्याचं काम करत आहेत. या भव्य नारळी सप्ताहात विचारांची देवाणघेवाण होते. आपल्यात काही तरी बदल व्हावेत यासाठी हा धर्म मंडप आहे. आठ दिवसांत काय प्रगती झाली हे महत्त्वाचे आहे. फिरता नारळी सप्ताह हा युवा शक्ती तरुणांना उपदेश देण्यासाठी आहे. आपल्या मंदिरांचे पवित्र्य आपण सांभाळा गावागावातील मंदिरे आपले धर्म केंद्र आहेत. तसेच संत हे ज्ञानाने ओळखा, तरुणांनो आपले भविष्य हे तळहातावर नसून मनगटातील बळात आहे. तरुणांनो लढायला शिका , सैनिकांचा आदर्श घ्या त्यांच्यामुळे आपण सुरक्षित आहोत. जवान आणि किसान यांच्यावर देश चालतो आहे. त्यांच्याविषयी कायम कृतज्ञता दाखवा तसेच जन्मदात्या आई-वडिलांची सेवा करा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी नारायणगडाचे सर्व टाळकरी, वारकरी, गायक, वादक, चोपदार भजनी मंडळ तसेच सर्व भक्त परिवार व पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या भव्य सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी उमापुर ,मारोतीचीवाडी आणि पंचक्रोशीतील भक्तगण मंडळी परिश्रम घेत आहेत.

सर्वांच्या एकीने हा भव्य उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतोय याबद्दल ग्रामस्थांचे सर्वत्र स्तरातून कौतुक होत आहे.

---

# अंगणवाडी आणि प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी बेमुदत आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील कोरळवाडी आणि दाभोळवाडी आदिवासी वाड्यातील मंजूर अंगणवाडी इमारतींचे बांधकाम तात्काळ सुरू करण्यासाठी तसेच कोरळवाडी येथील बंद असलेली प्राथमिक शाळा सुरू करण्याच्या मागणीसाठी एक एप्रिल पासून पनवेल पंचायत समिती येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले.कोरळवाडी येथील आदिवासींच्या मूलभूत आणि महत्त्वाच्या प्रश्नांकडून प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. रस्ता व पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. त्यानंतर गेल्या वर्षी त्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली. कोरळवाडी आणि शेजारी असलेल्या दाभोळवाडी येथे नऊ महिन्यांपूर्वी अंगणवाडी इमारतीचे काम मंजूर झाले. मात्र वन विभागाकडून जमीन




हस्तांतरण प्रस्ताव मंजूर न झाल्यामुळे ठेकेदाराने बांधकाम सुरू केले नाही. त्यामुळे लहान बालकांना सुरक्षित आणि आवश्यक सुविधा मिळत नाहीत. तसेच कोरळवाडी येथील प्राथमिक शाळा शासनाकडून बंद करण्यात आलेली आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. लहान मुलांना दूरच्या ठिकाणी शिक्षणासाठी जावे लागत असल्याने त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत. याबाबत यापूर्वी प्रशासनाकडे लेखी आणि तोंडी निवेदने देण्यात आली मात्र कार्यवाही झालेली नाही. या मागण्या मान्य कराव्या यासाठी एक एप्रिल पासून पंचायत समिती, पनवेल कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले.

---

# नावघाट बुरुड गल्ली येथे घाणीचे साम्राज्य; नागरिकांचा संताप, तात्काळ कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- प्रकाश गवारे** : शहरातील नावघाट बुरुड गल्ली परिसरात सध्या प्रचंड घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः बौद्ध विहारासमोर नाल्या तुंबल्यामुळे घाण पाणी थेट मैदानात साचत आहे. परिणामी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नाल्यांमध्ये बांधकामाचे साहित्य पडल्याने पाण्याचा निचरा होत नाही. तसेच अनेक



ठिकाणी रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकून ठेवण्यात आले असून, त्यामध्ये घाण पाणी साचून परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. याबाबत महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना वारंवार कळवूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, येत्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त या परिसरात विविध सामाजिक व लहान मुलांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. अशा परिस्थितीत परिसरातील अस्वच्छता ही चिंतेची बाब ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित विभागाने तातडीने नाल्यांची साफसफाई करावी, रस्त्यावर व नाल्यातील बांधकाम साहित्य हटवावे आणि संपूर्ण परिसरात स्वच्छता मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी नावघाट बुरुड गल्ली येथील नागरिकांनी केली आहे.

या मागणीसाठी सुरेश गजभारे, हाजी अहमद भाई, मुन्ना वासमवार, गंगाधर जोंधळे, मुरलीधर गजभारे, राजू ठाकूर, संतोष यादव, सचिन जोंधळे, संजय तारू, उत्तम जोंधळे, मारुती जोंधळे, किसन जोंधळे आदींसह सर्व नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

---

# तळा तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या रिक्त जागांचा पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे :** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 के व 243 झेड ए अन्वेय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने सदस्य / सरपंच यांच्या निधन, राजीनामा अपात्रता तसेच इतर अन्य कारणांमुळे रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांसाठी राज्यातील सुमारे 2444 ग्रामपंचायतीतील 471 सरपंच व 3120 सदस्यांच्या रिक्त पदांकरीता पारंपारिक पद्धतीने पोटनिवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. तळा तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या रिक्त जागेकरीता पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून ग्रामपंचायतीतील प्रभाग आणि प्रवर्गानुसार रिक्त जागांचा तपशील पुढीलप्रमाणे- रहाटाड प्रभाग क्रमांक - 1 अनुसूचित जमाती महिला, ग्रामपंचायत चरईखुर्द प्रभाग क्रमांक - 1 अनुसूचित जमाती महिला, प्रभाग क्रमांक - 3 नामप्र महिला, प्रभाग क्रमांक 1 अनुसूचित जाती सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 2 अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक 3 सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 3 सर्वसाधारण महिला, ग्रुप ग्रामपंचायत मांदाड प्रभाग क्रमांक 1 सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक 2 सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक 1 अनुसूचित जमाती महिला, ग्रामपंचायत भानंग प्रभाग क्रमांक 2 सर्वसाधारण महिला, ग्रामपंचायत निगुडशेत प्रभाग क्रमांक 2 अनुसूचित जाती



महिला, ग्रामपंचायत तळेगाव प्रभाग क्रमांक 2 सर्वसाधारण महिला प्रभाग क्रमांक 3 सर्वसाधारण महिला, अशा ग्रामपंचायतीतील सदस्य / सरपंच रिक्त जागांकरता इच्छुक उमेदवारांकडून नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची तारीख मंगळवार दि. 7 एप्रिल 2026 ते दि.13 एप्रिल 2024 सकाळी 11. ते दुपारी 3.वाजेपर्यंत तहसील कार्यालय तळा पहिला मजला ग्राम न्यायालय येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज स्वीकारण्यात येतील. पारंपारिक पद्धतीने विहित वेळेत विहित नमुन्यात नामनिर्देशन अर्ज सादर करणाऱ्या इच्छुक उमेदवारांचा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक. 17 एप्रिल 2026 दुपारी.3 वा. पर्यत उमेदवारांकडून निवडणूक लढवण्यात आल्यास मतदान दिनांक 28 एप्रिल 2026 सकाळी 7.30 वा ते संध्याकाळी 5.30 वा. पर्यंत घेण्यात येईल. मतमोजणी दिनांक 29 एप्रिल 2016 सकाळी 10 वा. तहसील कार्यालय तळा पहिला मजला ग्राम न्यायालय येथे घेण्यात येईल.

---

# धानोरा येथील घरकुल लाभार्थ्यांचे गटविकास अधिकारी यांना निवेदन; घरकुलासाठी रेती त्वरित उपलब्ध करा

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : राळेगाव तालुक्यातील धानोरा येथील घरकुल लाभार्थ्यांचे गटविकास अधिकारी केशव पवार यांना दि.१ एप्रिल २०२६ रोजी निवेदन देण्यात आले.शासनाचे मोदी आवास योजने अंतर्गत घरकूल मंजूर झाले आहे,मंजूर झालेल्या घरकूलाचे बांधकामा करीता रेतीची आवश्यकता आहे,रेती उपलब्ध न झाल्यामुळे घरकुलाचे काम रखडले आहे.आपले कार्यालयामार्फत सचिव धानोरा यांना केवळ पि.एम. घरकूल




योजनेच्या लाभाऱ्यांना रेती उपलब्ध करून देण्याबाबत लाभार्थ्यांची यादी व सुचना पत्राचा पि.डी.एफ सचिव यांना पाठविला असून त्यात मोदी आवास योजनेच्या लाभार्थ्याचे नावे समाविष्ठ नाही त्यामुळे आम्ही घरकुल लाभार्थी घरकुल लाभापासून वंचित आहोत,तरी लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्यात यावी,यावेळी घरकुल लाभार्थी शोभाबाई साखरकर,गंगाबाई फुलबांधे,रूपेश चौधरी,प्रितम घिनमिने,जितेंद्र घिनमिने,परसराम रेवतकर,गजानन चौधरी,किशोर फटिंग,रविंद्र घिनमिने,सुधाकर घिनमिने,प्रविण थुल,विशाल येणोरकर (उपसरपंच),गणेश फुलबांधे,विलास साखरकर (पत्रकार),दिनेश साखरकर,विजय चकोले,अविनाश घोडे,निलेश वरघणे,हर्षल घोडे उपस्थित होते.

---

# श्रीगुरुदेव सेवामंडळ, नागपूर पुरस्कृत पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** श्रीगुरुदेव सेवा मंडळ, नागपूरच्या वतीने 30 एप्रिल या तारखेस ग्रामजयंतीच्या निमित्ताने दरवर्षी समाजात सेवा भावनेने समर्पित कार्य करणाऱ्या व्यक्तींसाठी राष्ट्रसंत जीवन सेवाव्रती पुरस्कार, सामुहिक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य विचार प्रचार करणाऱ्या संस्थेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य विचार प्रचार पुरस्कार, संगीत, भजन व प्रबोधनात्मक कार्यासाठी अण्णाजी माहुलकर संगीत रत्न पुरस्कार तसेच निर्भीड पत्रकारितेसाठी देशभक्त वामनराव गावंडे पत्रकारिता पुरस्काराने गौरव केला जात असतो निवड झालेल्या व्यक्ती / संस्थांना 'ग्रामजयंती' कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन यथोचित सन्मान करण्यात येतो.पुरस्कारासाठी व्यक्ती अथवा संस्थेने दि. 20 एप्रिल 2026 पर्यंत आपल्या कार्याचा अहवाल नागपूर येथील श्री गुरुदेव सेवाश्रम, सुभाष पथ, गणेशपेठ या पत्त्यावर पाठवावा असे आवाहन श्रीगुरुदेव सेवामंडळ, नागपूरच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पदवाड यांनी केले आहे. प्रस्तुत पुरस्कार 30 एप्रिल 2026 रोजी होणाऱ्या 'ग्रामजयंती' सोहळ्यात वितरित करण्यात येईल.

**विनीत:**
डॉ. बाळासाहेब पदवाड
राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ

---

# महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर ; संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी अरविंद बनसोडे कुरनूरकर :** अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी आज महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची नवी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. १२६ जणांच्या या कार्यकारिणीत खजिनदारपदी अनिकेत नवले व अक्षय जैन, संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार आणि प्रशासन सरचिटणीसपदी विवेक गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय तनवीर विद्रोही, प्रशांत ओगले, प्रथमेश अबनावे, कपिल ढोके, अनुराग भोयर, आमेर अब्दुल सलीम, दिप्तेश परब, आफरीन हुसेन यांची उपाध्यक्ष पदी तसेच ४४ सरचिटणीस आणि ७४ प्रदेश सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या कार्यकारिणीत सर्वसामान्य कुटुंबातील आणि कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आली आहे. या कार्यकारिणीत तळागाळात काम करणाऱ्या आणि संघटनेसाठी सातत्याने झटणाऱ्या युवकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण होणार आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे युवकांमध्ये काँग्रेस पक्षाबद्दल आणि युवक काँग्रेसबद्दल आशादायी वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरातून या निर्णयाचे स्वागत आणि कौतुक होत आहे.

नव्या कार्यकारिणीतील पदाधिकारी काँग्रेस पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवतील व युवकांच्या प्रश्नांवर जोरदार आंदोलने करतील असा विश्वास युवक प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी व्यक्त केला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाचा प्रस्ताव महासभेत येणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील विरुपाक्ष सभागृहाजवळ असलेल्या अंतिम भूखंड क्रमांक १२२ वर उभारण्यात येणाऱ्या विद्यालयाला दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा सुधारित प्रस्ताव पुढील महासभेत सादर करण्यात येणार आहे. याबाबतच्या सूचना महापौर नितीन पाटील यांनी आज झालेल्या महासभेत प्रशासनाला दिल्या. शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या सभेला उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, नगर विकास सचिव, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी उपस्थित होते. पनवेल महानरपालिकेच्या माध्यमातून पनवेल शहरातील अंतिम भूखंड क्रमांक १२२ वर उभारण्यात येणाऱ्या विद्यालयाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा नवीन प्रस्ताव सुधारणेसह पुढील महासभेत सादर करण्याच्या सूचना महापौर नितीन पाटील यांनी आज झालेल्या महासभेत प्रशासनाला दिली. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चिरंजीव व पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून या विद्यालयासाठी तब्बल १० कोटी रुपयाची देणगी जाहीर करण्यात आली. त्याबद्दलही महापौर नितीन पाटील यांनी आभार मानले. तर यावर विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव दिले जाणार असेल तर आम्हांला आनंद आहे, असे सभागृहात स्पष्ट केले. गोरगरिबांच्या मुलांना माफक फीमध्ये दर्जेदार शिक्षण देणारी आणि नामांकित संस्था असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेला भाडेपट्ट्यावर अंतिम भूखंड क्रमांक १२२ भूखंड देण्याचा प्रस्ताव



महासभेच्या विषय पत्रिकेत होता. मात्र नेहमीच अविचारी बुद्धीने चालणाऱ्या विरोधी पक्ष अर्थात शेकाप आणि शिवसेना उबाठा गटाने या प्रस्तावाला विरोध केला. त्यामुळे सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांनी सडेतोड भूमिका मांडत विरोधकांच्या विरोधाभास भूमिकेचा समाचार घेतला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कधीही शिक्षणात राजकारण आणले नाही. याची त्यांनी सभागृहाला आठवण करून दिली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था हि सर्वसामान्यांची जाणीव असलेली संस्था आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था १९९२ पासून कार्यरत, अधिकृत आणि नोंदणीकृत संस्था आहे. नियमानुसार चालणारी हि संस्था आहे, असे सांगतानाच अनधिकृत शाळांची यादी शासनाने जाहीर केली आहे यामध्ये कुणाकुणाची नावे आहेत हे तुम्हांला माहित आहे असे म्हणत माजी आमदार बाळाराम पाटील यांचे नाव न घेत त्यांनी विरोधी पक्षाला चिमटा आणला.

ॲड. बिनेदार यांनी सभागृहाला पुढे सांगितले कि, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था पनवेलची आणि चांगल्या प्रकारे शिक्षण देत आहे, त्यामुळे या प्रस्तावाला मान्यता देण्याऐवजी विरोधकांनी विरोध दर्शविला त्यामुळे सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कमवा आणि शिका या तत्वावर शिक्षण घेतले. त्यांनी केलेले कष्ट आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेऊन त्यांनी शिक्षण क्षेत्राची सुरुवात केली. संस्थेचे चेअरमन शरद पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रयतचे एटीएम म्हणून संबोधिले आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांनी सुद्धा यांनी सुद्धा मला बेरीज करता येणार नाही एवढी देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्याचे सांगत जाहीरपणे त्यांचे कौतुक केले आहे. रयतने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने महाराष्ट्रात अनेक शाळा, महाविद्यालये उभारली आहेत. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या अनेक शाळा नॅकच्या ए प्लस प्लस दर्जाने मानांकीत आहेत. असे असतानाही विरोधीपक्षाकडून चांगल्या कामाला विरोध केला जात असेल तर तो कदापिही योग्य नाही. आमचे ५९ नगरसेवक आहेत आणि विरोधी पक्ष अल्पमतात आहे. आम्ही संख्याबळावर पण हा ठराव मजूर करून घेऊ शकलो असतो मात्र तसे आम्हांला करायचे नाही. विरोधकांकडून विरोध होत असेल तर तो भूखंड जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेला नको असे स्पष्टपणे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सभागृहात मांडले. या भूखंडावर पनवेल महापालिकेने शाळा उभारावी आणि त्या शाळेला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्यात यावे, असा प्रस्ताव त्यांनी मांडत या शाळेच्या नगरसेवक परेश ठाकूर यांच्याकडून १० कोटी रुपयांची देणगी दिली जाईल, असेही ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सभागृहात जाहीर केले. त्यानुसार पुढील महासभेत नवीन प्रस्ताव सादर करण्याची सूचना महापौर नितीन पाटील यांनी केली. दरम्यान यावेळी नगरसेवक ॲड . मनोज भुजबळ यांनी म्हंटले कि, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणासाठी आजपर्यंत दीडशे कोटी रुपयेहून अधिक देणगी दिली आहे.जनार्दन शिक्षण संस्थेत डोनेशन घेतले जात नाही माफक फीमध्ये शिक्षण दिले जाते तर पिल्लेज, डीएव्ही, महात्मा स्कुल अशा बाहेरून आलेल्या संस्था अवाजवी फी आणि डोनेशन घेऊन शिक्षण देत आहेत असे उल्लेखित करून एकप्रकारे विरोधी पक्षाला बाहेरच्या आणि गडगंज फी आकारणाऱ्या संस्थाचा पुळका असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी हि संस्था भूमिपुत्रांची आणि पनवेलची असल्याचे नमूद केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था चांगली शिक्षण संस्था असून त्यांनी विद्यार्थी घडवले आहेत असे नगरसेवक प्रकाश म्हात्रे व हरेश केणी यांनी म्हंटले. तर महाविकास आघाडीतुन स्वतःचा गट निर्माण करणाऱ्या नगरसेविका लीना गरड यांच्याकडून वारंवार सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणत सभागृहातील बेशिस्तपणा प्रत्यय सभागृहात अधोरेखित झाला होता. सवंग प्रसिद्धीसाठी आटापिटा न करता शिस्तीने सभागृहाचे काम चालावे, अशी सूचना यावेळी त्यांना महापौर यांनी केली.

## करंजाडे स्मशानभूमी येथे खासदार निधीतुन होणार विकासकामे

### शिवसेना उप तालुकाप्रमुख गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी :** करंजाडे येथील स्मशानभूमी येथे सुविधा देण्याबाबत शिवसेना उप तालुकाप्रमुख गौरव गायकवाड यांच्या पाठपुराव्यानुसार खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत विकास कामे केली जाणार आहेत.

सिडकोने वसाहत निर्माण करीत असताना नागरी सुविधा देणे महत्वाचे आहे. सिडकोच्या दुर्लक्षमुळे स्थानिक नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागतं



आहे. येथील स्मशानभूमी येथे दशक्रिया विधी शेड तसेच बैठक व्यवस्था व्हावी यासाठी करंजाडे येथील शिवसेना उप तालुकाप्रमुख गौरव गायकवाड यांनी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करीत होते. यावेळी खा बारणे यांनी या कामाला खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत निधीतून १५.०० लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. याबाबतचे पत्र रायगड जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे. त्याचबरोबर पत्र माऊली घोगरे यांनी रघुनाथ पाटील तालुका प्रमुख यांच्या समावेश गौरव सुरेश गायकवाड यांच्या कडे सुपूर्त केला व लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.

## राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ ; शिशुवर्ग ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना दिलासा

**दैनिक युवक आधार**

**जोत्स्ना करवाडे विदर्भ संपादिका : राज्यातील** दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे.

महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्यूमेंटमध्ये शिक्षण आणि कौशल्य विकास वृध्दिंगत करणे असा मुद्दा समाविष्ट आहे. या उद्दिष्टाला अनुसरून दिव्यांगांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ



करण्यात येत आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना 8 ते 34 वर्षे जुन्या आहेत. या योजनांमध्ये कालानुरूप बदल करणे आवश्यक असल्याने तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 मध्ये दिव्यांगांना सामान्य व्यक्तीपेक्षा अधिक लाभ देण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व 21 प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 500 रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 800 रूपये (निवासी), 600 रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा 1000 रूपये (निवासी), 800 रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल. यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा 100 ते 200 रूपयांच्या दरम्यान होती. याशिवाय अकरावी व बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी दरमहा 150 रूपये वाचक भत्ता आणि दरवर्षी प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत 1500 रूपये अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. बैठकीत या योजनेसाठी अपेक्षित 23 कोटी 11 लाख रूपयांच्या आवर्ती तरतुदीस मान्यता देण्यात आली.

## पादचाऱ्याला इको टॅक्सीची धडक, पादचारी जखमी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** केवाळे बस स्टॉप जवळ काळया पिवळया रंगाच्या इको टॅक्सीने पादचाऱ्याला धडक दिली. या धडकेत मोहन मुरमुर हा जखमी झाला. या प्रकरणी चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.मोहन मुरमुर हा पायी चालत जात असताना हरीग्राम ते केवाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील केवाळे बस स्टॉप जवळ काळया पिवळया रंगाच्या इको टॅक्सीने संध्याकाळी साडेसातच्या सुमारास त्याला ठोकर मारून अपघात केला. त्यात त्याच्या पाठीवर आणि डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला सुकापुर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## मेंडका गावची कन्या श्रेया सुदेवाड हिला ‘खेलो इंडिया’मध्ये कास्यपदक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : प्रकाश गवारे**

**मेंडका** (ता. मुदखेड,. नांदेड येथील कु. श्रेया संजय सुदेवाड हिने ‘खेलो इंडिया’ गेम स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत ४×१०० मीटर रिले स्पर्धेत कास्यपदक पटकावले आहे. छत्तीसगड राज्यातील जगदलपूर येथे सुरू असलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत ही उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

श्रेयाच्या या यशामुळे संपूर्ण नांदेड जिल्ह्यासह मेंडका गावाचा मान उंचावला आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर तिने हे यश संपादन केले असून सर्व



स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.


स्पर्धेतील विजेत्यांना पदके केंद्रीय राज्य क्रीडा मंत्री रक्षाताई खडसे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या गौरवाच्या क्षणी श्रेयाच्या यशाचा सर्वांनी मनापासून गौरव केला.

श्रेयाच्या या यशाबद्दल मेंडका येथील प्रशांत निखाते व ग्रामस्थ, नातेवाईक, ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्य तसेच विविध क्षेत्रातील शासकीय अधिकारी मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून भविष्यातही ती असेच यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.यावेळी कु. श्रेया सुदेवाड हिचे मार्गदर्शक सचिन शिंदे सर व कोच परमेश्वर इंजेपवाड यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले.

## मेंढपाळाचा मुलगा रामचंद्र गलांडे "कर सहाय्यक अधिकारी "झाल्याचा पिलीवकारांना होतोय अत्यानंद"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-** माळशिरस तालुक्यातील पिलीव (झिंजेवस्ती) येथील मेंढपाळाचा व्यवसाय केलेल्या आणि अक्षराचा गंधही नसलेल्या कै. यशवंत नामदेव गलांडे यांचा मुलगा रामचंद्र यशवंत गलांडे याने एमपीएससी परीक्षेमध्ये अतिशय मेहनतीने आणि कष्टाने आर्थिक परिस्थितीच्या रेट्या पुढचा दबाव सहन करत त्याचप्रमाणे शालेय जीवनामध्ये मनाशी खुणगाट बांधून मी अधिकारी होणार या निश्चयाने अथक प्रयत्नातून प्रापंचिक जबाबदारी सांभाळत वैवाहिक जीवनामध्ये जबाबदाऱ्या पार पडत असताना देखील मोठे यश संपादन करून कर सहाय्यक या पदाला गवसणी घातली आणि यश खेचून आणले. अशा या रामचंद्र यशवंत गलांडे याचा गावोगावी सन्मान होत असून सर्व पिलीवकर



अभिमान बाळगत आहेत. वास्तविक माता-पिता निरक्षर असताना देखील रामचंद्र यांनी अतिशय अडचणीच्या परिस्थितीमधून आपल्या जीवनाची वाटचाल सुरू ठेवून अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केल्याचे त्याचे नातेवाईक मित्रपरिवार सांगत आहेत.

## मुख्यमंत्री सचिवालय (जनसंपर्क कक्ष)

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

• अहिल्यानगर जिल्ह्यातील साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी १ हजार २३४ कोटी रुपयांच्या तरतूदीस मान्यता. सुमारे ३२ अवर्षणग्रस्त गावांना लाभ होणार, ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा मिळणार (जलसंपदा, विभाग)

• महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन. राज्यातील ५४ नदी प्रदुषित पट्ट्यांबाबत पूनरूज्जीवन प्रकल्प राबविणार. (पर्यावरण व वातावरणीय बदल, विभाग )

• अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी मौजे नवसारी येथील १६७०८ चौ.मी.जागा (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क, विभाग)

• अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाबाबत निवेदन, अर्जांबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती (सामाजिक न्याय विभाग)

• भूमि अभिलेख विभागात आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद. हे पद पदोन्नती व विभागीय भरतीद्वारे भरता येणार. राज्यातील भूकरमापक संवर्गातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा (महसूल विभाग)

• राज्यातील हजारो दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ. आठवी ते बारावीच्या दिव्यांग विद्यार्थांना मोठा दिलासा. बारा वर्षानंतर शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ (दिव्यांग कल्याण विभाग)

## दिलखुलास’ कार्यक्रमात हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची विशेष मुलाखत

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी विजय खुडे**

**हिंगोली :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘दिलखुलास’ कार्यक्रमात हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. प्रशासन, विकास आणि लोकसहभाग यांचा समतोल साधत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणी आणि नियोजनावर या मुलाखतीत सविस्तर प्रकाश टाकण्यात आला आहे.

'दिलखुलास'कार्यक्रमात ही मुलाखत गुरुवार, दि. २ आणि शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर प्रसारित होणार असून ‘News On AIR’ या मोबाईल ॲपवरही ऐकण्यासाठी उपलब्ध राहणार आहे. निवेदक संजय पाटोळे यांनी ही मुलाखत घेतली आहे.



मुलाखतीदरम्यान जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाची सकारात्मक व दूरदृष्टी मांडली. विविध शासकीय योजनांमध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्ह्यात महसूल अभियान, आरोग्यविषयक मोहिमा, सिंचन प्रकल्प तसेच पायाभूत सुविधा विकासाच्या कामांद्वारे नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय पर्यटन विकास, शेती क्षेत्रातील नव्या संधी, युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती तसेच महिला स्वयंरोजगारासाठी स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर याबाबत प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी गुप्ता यांनी 'दिलखुलास' कार्यक्रमातून दिली आहे.

## खारघरमध्ये २२ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता ; पतीसोबत किरकोळ वादानंतर घर सोडले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** खारघर परिसरातून एका २२ वर्षीय विवाहित महिलेच्या बेपत्ता होण्याची घटना समोर आली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात मिसिंग रजिस्टर क्रमांक २४/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुस्कान तमजुल शेख (वय २२) या खारघर सेक्टर १० येथील कोपरागाव परिसरातील रेडियम सोसायटीत पतीसोबत वास्तव्यास आहेत. दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास पतीसोबत किरकोळ वाद झाल्यानंतर त्या घरातून निघून गेल्या. मात्र त्या त्यानंतर अद्याप परत न आल्याने कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली. महिलेचे वर्णन गोरा रंग, अंदाजे ५ फूट उंची, काळे लांब केस, सडपातळ बांधा असे असून, त्या घरातून निघताना



लाल रंगाची कुर्ती व सलवार परिधान केली होती. त्या मराठी व हिंदी भाषा बोलू शकतात. या प्रकरणी पती तमजुल अख्तर शेख (वय २८) यांनी दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत. कोणालाही संबंधित महिलेबाबत माहिती असल्यास खारघर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उपोषणाला यश! ग्रामसेवक बदलीचे १० दिवसांत लेखी आश्वासन”

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील तितूर येथील ग्रामस्थांच्या मागण्यांना अखेर यश आले असून सुरू असलेले उपोषण स्थगित करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड यांनी उपोषणस्थळी भेट देत ग्रामसेवक बदलीबाबत सकारात्मक भूमिका घेतली. त्यांनी येत्या दहा दिवसांच्या आत आवश्यक कारवाई करून बदली करण्यात येईल,असे लेखी आश्वासन दिले.या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांनी आपले आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.यावेळी ग्रामविस्तार अधिकारी दौंड साहेब,ग्रामविस्तार अधिकारी राकडे नाना तसेच पंचायत समिती सदस्य आमखेडा गणाचे पवार साहेब उपस्थित होते. उपोषणामध्ये सुनील धनराज माने, अशोक कडबा




कदम,श्रीकांत संजय जाधव,देवराम दला सोनवणे आणि सतीश नाना पवार यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे प्रशासनाला निर्णय घ्यावा लागला.“जनतेच्या एकजुटीसमोर प्रशासनालाही झुकावे लागते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे,” अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## दोन घरांमध्ये घरफोडी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) : दोन** बंद घरांमध्ये घरफोडी करत चोरांनी चांदीच्या, पितळेच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अर्जुन मोहिते (राहणार सेक्टर 15 ए, नवीन पनवेल) यांच्या रूमच्या दरवाजाचे लॉक तोडून चोराने चांदीच्या समई, घंटी, पैंजण, जोडवी, कंगन, सोन्याचे बदाम, रोख रक्कम आणि देवाच्या पितळेच्या मूर्ती चोरून नेल्या तर त्यांच्याच सोसायटीमधील पहिल्या माळ्यावरील रूम नंबर तीन मधील अक्षया व्यंकटेश्वरा यांच्या घरातून देखील चांदीचे दिवे, समई, वाट्या, ग्लास आणि रोख रक्कम व देवीच्या मूर्ती चोरून नेल्या.

# इंग्रजी साहित्यातील ‘नव्या आयामांवर’ मंथन

## सिल्लोडमध्ये ३ महाविद्यालयांचा उपक्रम; ६५ शोधनिबंधांचे विमोचन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर : सिल्लोड** येथील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा इंग्रजी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (सिल्लोड) आणि श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय (देवगाव रंगारी, ता. कन्नड) यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंग्रजी भाषा आणि साहित्यातील नवीन आयाम' या विषयावर ऑनलाईन राष्ट्रीय वेबिनार नुकतेच उत्साहात पार पडले.




या चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रमेश चौगुले यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सोशल मीडिया, ट्विटर, इंस्टाग्राम व इमोजींच्या माध्यमातून इंग्रजी साहित्यात होत असलेल्या विस्तारावर प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे म्हणून बरकतुल्ला विद्यापीठ (भोपाळ) येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आशिष गुप्ता यांनी भारतीय ज्ञान परंपरेतील इंग्रजीचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गुरुदत्त राजपूत होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी बीजभाषण करताना तौलनिक साहित्य, अनुवाद आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) साहित्यावरील प्रभाव यावर विवेचन केले. तांत्रिक सत्रात नागपूर विद्यापीठाचे डॉ. कपिल सिंघेल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. मुस्तजीब खान यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्षपद प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांनी भूषवले.

समारोप सत्रात सोलापूर विद्यापीठाच्या डॉ. अँनी जॉन यांनी कोविडोत्तर साहित्यावर भाष्य केले, तर फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी विभागप्रमुख डॉ. अर्जुन जाधव यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी केला.या वेबिनारमध्ये देशभरातून २२५ संशोधक सहभागी झाले होते. मान्यवरांच्या हस्ते ६५ शोधनिबंधांच्या विशेष अंकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्ताविक संयोजक डॉ. संतोष चौथाईवाले यांनी केले.

पाहुण्यांचा परिचय डॉ. सदाशिव पवार यांनी करून दिला, तर अहवाल वाचन डॉ. रूपाली पालोदकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अस्मिता साळवे व डॉ. जयनारायण परदेशी यांनी केले. आभार प्रा. गोपाल सूर्यवंशी यांनी मानले.

यशस्वीतेसाठी डॉ. निलेश मिसाळ, डॉ. उज्वला कळात्रे, डॉ. अजित येळवंडे, डॉ. चंद्रशेखर देवकाते, डॉ. रविकांत जाधववर व प्रा. दिलीप अगरवाल यांनी परिश्रम घेतले.

# तिसऱ्यांदा वाघाचा महिलेवर हल्ला; आमगांव/बुज. येथील घटना साकोली उपजिल्हा रुग्णालयात जनता धडकली; गंभीररीत्या जखमी महिलेस नागपुरात हलविले; पोलीसांची रूग्णालयात धाव

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे : भंडारा** -साकोली तालुक्यात सतत वाघाचा हल्ल्यात महिला पुरुष जखमी होण्याचे सत्र थांबत नाही आहे. तर परत ( बुधवार. ०१ एप्रिलला सकाळी ०९ दरम्यान आमगांव बुज. परीसरात शेतात काड्या जमा करणा-या महिलेवर वाघाने हल्ला करून गंभीर जखमी केले. महिलेस उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे सामाजिक कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांनी एकच गर्दी केली व त्या वाघाला जेरबंद करून दुरवरील वन्यजीव संरक्षण क्षेत्रात सोडण्यात यावे अशी मागणी केली. रूग्णालयात पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर हे स्वतः पोलीस दलांसह उपस्थित झाले व जनतेच्या आक्रोशावर नियंत्रण ठेवले होते.


आज बुधवार ता. ०१ एप्रिलला स. ०९ दरम्यान तालुक्यातील आमगांव/



बुज. येथील महिला छाया सुधाकर मुंगमोडे ५३ या शेतामध्ये काड्या जमा करत असतांना तीचेवर वाघाने अचानक मागेहून हल्ला केला यात मानेला आणि कानाला जबर जखमी केले. त्यांचा १७ वर्षीय मुलगा तन्मय यांनी आरडाओरड करित वाघाच्या मागे धावल्याने वाघ छाया यांना गंभीर जखमी करीत पळून गेला. व त्यांचा जीव वाचला. छाया या गंभीर जखमी झाल्याने त्यांना साकोली उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर नागपूर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. छाया यांच्याकडे दोन एकर जमीन असून त्या शेतामध्ये व काड्या जमा करण्यासाठी गेल्या होत्या. काड्या जमा करतांनाच अचानक त्यांच्यावर वाघाने हल्ला केला. त्यांचा उदरनिर्वाह पूर्णपणे शेतीवर असून पती, व सतरा वर्षीय मुलगा व एक सहा वर्षाची मुलगी आहे. बांपेवाडा परिसरात या १२ दिवसात वाघाने तीन वेळा हल्ला केला आहे. यात बांपेवाडा येथील वसंता मेश्राम यांचा जीव गेला तर उमरझरी येथील महिला माया रामकृष्ण सोनवाने यांच्यावरही हल्ला करून जखमी केले. परत काल छाया मुंगमोडे यांच्यावर हल्ला केला. या तिन्ही घटनेत हल्ला करणारा वाघ हा एकच व तो नरभक्षक झाला आहे. यामुळे परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले असून या वाघाला जेरबंद करण्याची मागणी उपजिल्हा रुग्णालयात धडकलेले जि. प. सदस्य अविनाश ब्राम्हणकर, माजी जि. प. स. नेपाल रंगारी, माहेश्वरी नेवारे, साकोलीच्या नगराध्यक्ष देवश्री कापगते, पिंडकेपारचे सरपंच नंदू समरीत, माजी नगरसेवक ॲड. मनिष कापगते, खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचे स्वीय सहाय्यक मेदन लांडगे यांसह साकोली सेंदूरवाफा शहरातील अन्य सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे.

उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. भास्कर गायधने यांनी महिलेवर तात्काळ प्राथमिक उपचार सुरू केले होते. येथे जनतेची गर्दी पाहता पोलीस निरीक्षक एम. पी. आचरेकर हे पोलीस चमूंसह रूग्णालयात दाखल होत परीस्थितीवर नियंत्रण ठेवून होते. याची अधिक माहिती घेतली आहे महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे यांनी.

## "पिलीव याठिकाणी गुढीपाडवा उत्साहात साजरा तर श्री शंभू महादेवाच्या कावडींचे शिंगणापूरकडे प्रस्थान"





**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर:** -माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे व हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे मराठीनवीन वर्षाच्या निमित्ताने गुढीपाडवा सणाचे औचित्य साधून घरोघरी आनंदाने गुढ्या उभारून उभारून मनोभावे पूजा करून नैवेद्य दाखवून आरती करून अतिशय आणि आनंदाने घरोघरी गुढीपाडवा साजरा करण्यात आल्याचे दिसून आले आणि त्याच दिवशी महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिखर शिंगणापूर श्री शिवपार्वती (शंभू महादेव) यात्रेसाठी गावातील परंपरेप्रमाणे शिवपार्वतीचे भक्त व कावडी खेळाडूंनी यांनी कावडीचा रंगतदार व दिमाखदार खेळ दाखवत अनेक देवाधिकांचे दर्शन घेतले. ग्रामस्थांनी अनेक देवदेवतांचे दर्शन घेतले. आणि गुढीपाडवा व महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिखर शिंगणापूर येथील यात्रेनिमित्त श्री शंभू महादेवाच्या (शिवपार्वती) दर्शनासाठी सज्ज राहून चैत्री एकादशीच्या दिवशी सर्व शिवपार्वतीच्या भक्तांनी (कावडी खेळाडूंनी) वाजत गाजत" हरहर महादेवच्या जयघोषा मध्ये"कावडींचे प्रस्थान शिखर शिंगणापूर कडे केले. यामुळे पिलीव पिली व परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

याच कावडी "श्री हनुमान जन्मोत्सवाच्यादिवशी" पिलीव नगरीमध्ये येऊन परंपरेप्रमाणे ग्रामस्थांना व भाविक भक्तांना कावडींच्या दर्शनाचा लाभ देत असतात. पिलीवच्या कावडींना शिखर शिंगणापूर येथे मोठा सन्मान दिला जात असल्याची परंपरा ही आहे.

## "पिलीव याठिकाणी श्री प्रभू रामचंद्रांच्या जन्मोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे चालू वर्षी सुद्धा श्रीराम गल्लीमध्ये असलेल्या श्रीराम मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाने "श्री प्रभू रामचंद्र यांच्या जन्मोत्सवाचा "कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. या जन्मोत्सवाच्या कार्यक्रमासाठी आसपासच्या गावातील ही अनेक रामभक्त आवर्जून उपस्थित राहिले होते. किर्तन सेवेनंतर फटाक्याच्या आतषबाजी मध्ये आणि तोफांच्या सलामीत टाळ मृदुंगाच्या गजरात "श्री प्रभू रामचंद्रांच्या जन्मोत्सवाचा" कार्यक्रम भक्तीमय वातावरणामध्ये संपन्न झाला. त्याचप्रमाणे सालाबाद प्रमाणे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मध्ये सुद्धा सुश्राव्य भजनाचा



कार्यक्रम आयोजित करून श्री प्रभू रामचंद्रांच्या जन्मोत्सवाचा कार्यक्रम अतिशय उल्हासित वातावरणात व भक्तिमय स्वरूपात संपन्न झाला. या ठिकाणीही असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

दोन्हीही ठिकाणी आरतीनंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. या दोन्हीही कार्यक्रमामुळे "श्रीराम जय राम जय जय राम रघुपति राघव राजाराम पतित पावन सिताराम"या जयघोषामध्ये पिलीव नगरी दुमदुमल्याचे दिसून आले .

# शिवरायांचे विचार जगणारा नेता महेंद्रशेठ घरत! रोहे तालुक्यातील ग्रामस्थांचे मत

### अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**
**उलवे,प्रतिनिधी :** महेंद्रशेठ घरत सध्या रायगड जिल्हाध्यक्ष या नात्याने रायगडच्या दौऱ्यावर आहेत. संघटन सृजन अभियानांतर्गत हा दौरा सुरू आहे. मंगळवारी (ता. ३१ )त्यांनी पेण, रोहे, माणगाव या ठिकाणी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सोबत कॉंग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक आहेत. त्या रायगड जिल्हा निरीक्षक आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्येक तालुकानिहाय कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची मते आजमावून घेतली. दरम्यान, महेंद्रशेठ घरत यांनी पाली येथील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील अनेक मंदिरांना महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते देणग्या दिलेल्या आहेत. त्यामुळे रोहे तालुक्यात त्यांचे पदार्पण होताच तेथील देवकान्हे आणि दिव येथील मंदिरात ते गेले. त्यावेळी तेथील ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचे जोरदार स्वागत केले. दिव येथील कोळी समाजाने हनुमान मंदिर बांधले आहे. या मंदिरासाठी महेंद्रशेठ घरत यांनी भरघोस देणगी दिली आहे. त्यामुळे

महेंद्रशेठ घरत मंदिरात येणार याची चाहूल लागताच संपूर्ण कोळी समाज त्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार जगणारा कलियुगातील एकमेव



नेता महेंद्रशेठ घरत!' असे यावेळी रोहे तालुक्यातील ग्रामस्थांनी बोलून दाखवले.

दिव येथील सुंदर हनुमान मंदिर पाहून महेंद्रशेठ घरत यांना मनस्वी आनंद झाला. आपण योग्य ठिकाणी देणगी दिली आणि ग्रामस्थांनी तिचा योग्य वापर केला आणि देखणे मंदिर बांधले याचे समाधान महेंद्रशेठ घरत यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. यावेळी दिव ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "कोळी समाजावर माझे नितांत प्रेम आहे. अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज कौतुकास पात्र आहे. हा समाज अहोरात्र कष्ट करून सन्मानाने जगतो. देवावर अपार श्रद्धा ठेवून भक्तिभावाने उत्सव साजरा करून गावात एकोपा ठेवतो. त्यामुळे दिव येथील कोळी समाजाने सुंदर हनुमान मंदिर बांधून गावची शान वाढवली आहे. त्यामुळे दिव ग्रामस्थांचे अभिनंदन!"

यावेळी दिव येथील ग्रामपंचायत सदस्य आणि हनुमान मंदिर अध्यक्ष सत्यवान तांडेल, उपाध्यक्ष महादेव तांडेल, सागर हवालदार, शांताराम हवालदार, महेंद्र कठोरे, चंद्रकांत हवालदार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## माता रमाई आंबेडकर नगर घाटकोपर पूर्व मुंबई येथील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ रिप.पँथर नेते डॉ. हरिष अहिरे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** घाटकोपर पुर्व माता रमाई आंबेडकर नगरातील ज्येष्ठ पँथर - रिपब्लिकन नेते डॉ. हरिष अहिरे ( ८० वर्षे ) यांचे बुधवार,दिनांक.१ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३ वाजता ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा दुपारी ३ वाजता सोना नर्सिंग होम येथील निवासस्थाना पासून निघाली अशी माहिती त्यांच्या कन्या डॉ. पल्लवी अहिरे यांनी दिली.

डॉ. अहिरे यांचे 'भारतीय दलित पँथर' आणि 'रिपब्लिकन पार्टी



ऑफ इंडिया' तद्वतच आंबेडकरी विचारांच्या सामाजिक चळवळीत मोठे योगदान राहिले आहे. 'घाटकोपर येथील (रमाबाई नगर ) हत्याकांड' हे त्यांचे पुस्तक लक्षवेधी ठरले होते. आंबेडकरी चळवळीतील लढाऊ नेते, कार्यकर्ते आणि लेखक म्हणून ते परिचित राहिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी अनेक गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरवली आहे. विशेषतः कोरोना महामारीच्या कालावधीत कोरोनाग्रस्त लोकांना त्यांनी विशेष सहाय्य केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली आणि एक मुलगा, बंधू ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गंगाधर अहिरे असा परिवार आहे.

## पत्रकार तथा समाजसेवक संजीव भांबोरे पहेला/ श्रीनगर गट ग्रामपंचायतची सर्वसाधारण गटातून सरपंच पदाची निवडणूक लढणार?

### गाव समस्याची जाणीव, भुलथापा ,आमिष दाखविणाऱ्यांना येत्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा

**दैनिक युवक आधार**
भंडारा तालुक्यातील पहेला येथील रहिवासी पत्रकार तथा समाजसेवक, सामाजिक ,राजकीय, विविध सामाजिक क्षेत्रातला अनुभव असलेले ,कुशल नेतृत्व ,वक्तृत्व असलेले, वेळप्रसंगी रस्त्यावर उतरणारे व विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडणारे ,सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणारे , गावाला नवीन गतिमान दिशा देण्याकरिता, नवीन काही करून दाखविण्याकरिता, प्रत्येक वार्डातील लोकांना केंद्रबिंदू म्हणून त्यांच्या सहकार्याने नवीन योजनांना दिशा देण्याकरिता, तरुणांना नवीन स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून देण्याकरिता, दिव्यांग, विधवा ,शेतमजूर, प्रकल्पग्रस्त सर्वांना न्याय मिळवून देण्याकरिता, 24 तास जनतेच्या संपर्कात,कधी न थांबणारा, विद्रोही पत्रकार संजीव भांबोरे यांनी पहेला/ श्रीनगर सर्वसाधारण गटातून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असून मतदारांनी ठेकेदारी करणाऱ्या व गावाची समस्येची जाणीव नसलेल्या ,भुलथापा व आमिष देणाऱ्या उमेदवारांना मतदारांनी त्यांना धडा शिकवले तरच गावाचा विकास होऊ शकते. म्हणून येत्या काही महिन्यात येणाऱ्या सरपंचाच्या निवडणुकीत मतदारांनी सावध राहावे असा इशारा सुद्धा पत्रकार तथा समाजसेवक संजीव मुरारी भांबोरे यांनी दिलेला आहे.



# रिझर्व बँक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१ एप्रिल हा दिवस भारतासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो,कारण याच दिवशी भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ची स्थापना झाली. त्यामुळे १ एप्रिल हा दिवस "आरबीआय दिवस" म्हणूनही ओळखला जातो. १ एप्रिल १९३५ हा दिवस भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील एक ऐतिहासिक टप्पा मानला जातो. भारतीय रिझर्व्ह बँक ही भारत सरकारने स्थापन केलेली आणि चालवली जाणारी देशाची मध्यवर्ती बँक आहे. चलनविषयक धोरण, बँकांचे नियमन, आर्थिक स्थैर्य राखणे आणि महागाई नियंत्रण ही या बँकेची मुख्य कार्ये आहेत.

**रिझर्व बँकेची स्थापना कशी झाली?**

भारतासाठी मध्यवर्ती बँकेची कल्पना सर्वप्रथम १७७१ मध्ये वॉरेन हेस्टिंग्ज यांनी मांडली होती. त्यानंतर १९२६ मध्ये हिल्टन यंग आयोगाने भारतासाठी स्वतंत्र मध्यवर्ती बँक स्थापन करण्याची शिफारस केली. या शिफारशीच्या आधारे ६ मार्च १९३४ रोजी आरबीआय कायदा संसदेत मंजूर करण्यात आला आणि १ एप्रिल १९३५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेची अधिकृत स्थापना झाली. सुरुवातीला या बँकेचे मुख्यालय कोलकाता येथे होते. नंतर १९३७ मध्ये ते कायमस्वरूपी मुंबई येथे हलविण्यात आले.

पहिले गव्हर्नर सर ओसबोर्न स्मिथ हे होते. त्यांचा कार्यकाळ १ एप्रिल १९३५ पासून ते १ जून १९३७ पर्यंत होता. पहिले भारतीय गव्हर्नर म्हणून सी.डी. देशमुख यांनी कार्यभार सांभाळला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर रिझर्व बँक ऑफ इंडिया ने जून १९४८ पर्यंत पाकिस्तानची मध्यवर्ती बँक म्हणून काम केले. रिझर्व बँकेचे १९४९ मध्ये भारत सरकार द्वारे राष्ट्रीयीकरण केले गेले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताचे संविधान निर्माते नव्हते, तर ते एक महान अर्थशास्त्रज्ञही होते. त्यांनी




भारतातील अर्थव्यवस्था, शेती, चलनप्रणाली आणि कामगार धोरण यांचा सखोल अभ्यास केला होता.या ग्रंथात त्यांनी भारतीय चलनप्रणालीतील त्रुटी, रुपयाचे अवमूल्यन आणि त्यावर उपाय यांचे सखोल विश्लेषण केले.हिल्टन यंग आयोगाने भारतीय रिझर्व्ह बँकेची रचना करताना या पुस्तकातील विचारांचा आधार घेतला होता. आर्थिक विकासासंदर्भात डॉ.आंबेडकर यांच्या मते, अल्पभूधारक घटकांवर आधारित भारतीय शेतीची उत्पादकता व उत्पन्न कमी असण्याचे मूळ कारण म्हणजे शेती मधील अल्प भांडवली गुंतवणूक आहे. फक्त शेतीच नव्हे, तर कामगारांचे आर्थिक धोरण यावर सुद्धा त्यांनी विस्तुत विचार व मांडणी केली आहे. डॉ.आंबेडकरांनी भारतातील संपूर्ण घटकांचा विशलेषणात्मक अभ्यास केला होता. त्यात भारतीय अर्थव्यवस्था व त्यावरील समस्यांचे उपाय यावर त्यांनी जागतिक दर्जाच्या तीन पदव्या संपादन केली होत्या. अर्थशास्त्रावर ३ प्रबंध कोलंबिया(अमेरिका ) व लंडन विद्यापीठात सादर केले. विशेष म्हणजे तीनही प्रबंध पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आले. ते ३ प्रबंध म्हणजे ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि वित्तप्रणाली, ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती, भारतीय रुपयाचा प्रश्न(दि प्रॉब्लम ऑफ रूपी) हे होत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा प्रबंध होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'दि प्रॉब्लम ऑफ रूपी' ह्या प्रबंधाचे पुस्तकात रूपांतर होऊन १९२३ साली लंडन मध्ये प्रकाशित झाले. भारतीय रिझर्व बँकेची रचना आणि दृष्टीकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'दि प्रॉब्लम ऑफ रूपी : इट्स ओरीजीन अँड इट्स सोल्युशन' या पुस्तकातून घेतले आणि हिल्टन यंग आयोगाकडे सादर केले. या बँकेची स्थापना १९२६ च्या रॉयल संस्थेच्या शिफारसीच्या आधारे झाली. या बँकेचा मूळ शिक्का म्हणून ईस्ट इंडिया कंपनीचे चिन्ह - म्हणजेच नारळाचे झाड आणि सिंह असे होत. पण त्या चिन्हात बदल करण्यात आला आणि सिंहाऐवजी भारताचा राष्ट्रीय प्राणी वाघ याचा चिन्हात समावेश करण्यात आला. सुरुवातीला मुख्य कार्यालय कोलकाता येथे होते, जे १९३७ मध्ये कायमस्वरूपी मुंबईत हलविण्यात आले. भारतीय रिझर्व बँक ही देशपातळीवर आर्थिक संस्थांना शिस्त आणण्याचे काम करते. रिझर्व बँक वार्षिक ,सहामाही तसेच तिमाही आर्थिक धोरण व पतधोरण (मौद्रिक धोरण व पतधोरण) जाहीर करते. रिझर्व्ह बँकेचे कामकाज पाहण्यासाठी एक पूर्ण वेळ गव्हर्नर, चार डेप्युटी गव्हर्नर, १६ सदस्यांचे संचालक मंडळ यांची नेमणूक १९३४च्या आरबीआय च्या कायद्यानुसार भारत सरकारकडून चार वर्षांकरिता केली जाते.

**रिझर्व बँकेच्या स्थापनेत आंबेडकरांचे योगदान**

डॉ.आंबेडकरांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करून भारतासाठी स्वतंत्र मध्यवर्ती बँक असणे किती आवश्यक आहे हे स्पष्ट केले. त्यांच्या "The Problem of the Rupee" या पुस्तकातील विचारांवर आधारितच भारतातील चलन आणि बँकिंग व्यवस्था सुधारण्याचा निर्णय घेण्यात आला.भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय ज्ञान आणि दूरदृष्टी होती, याचा समस्त भारतीयांना अभिमान आहे.

डॉ. आंबेडकरांनी सुचवलेली मार्गदर्शक तत्वे आणि कार्यप्रणाली यावर आजही ही बँक खंबीरपणे उभी आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ साली ५०० आणि १००० रुपयांच्या नोटांचे विमुद्रिकरण (नोटा बंदी) केले. ही मूळ संकल्पना डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या "द प्रॉब्लेम ऑफ रुपी" या पुस्तकातून घेण्यात आली होती.

**रिझर्व बँकेचे पहिले गव्हर्नर..**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर सर ऑसबोर्न स्मिथ होते. त्यानंतर पहिले भारतीय गव्हर्नर म्हणून सी. डी. देशमुख यांनी कार्यभार सांभाळला.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल इतर अर्थशास्त्रज्ञांचे मत...**

भारताचे नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा आदर करतात. ते असे म्हणतात की,"डॉ. आंबेडकर हे माझ्या वडिलांसमान आहेत, त्यांच्या एवढ्या जागतिक कीर्तीचा महान अर्थशास्त्रज्ञ होणे नाही." लंडनमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे डॉ. आंबेडकरांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन सुद्धा सुरु करण्यात आले आहे.

थोडक्यात सांगायचे तर, भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना ही केवळ एक प्रशासकीय निर्णय नव्हती, तर ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची आणि दूरदृष्टीची फलश्रुती होती. म्हणूनच १ एप्रिल हा दिवस केवळ "आरबीआय दिवस" नसून भारताच्या आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**जयश्री कल्पना अशोक साळुंखे**
**अधिव्याख्याता संगणक अभियांत्रिकी,**
**शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे**

# 'डिजिटल इंडिया'तही सावकारीचा फास कायम!

महाराष्ट्र राज्याचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या आणि औद्योगिक विकासाचे केंद्र असलेल्या ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांमधून समोर आलेली सावकारी कर्जाची आकडेवारी केवळ धक्कादायकच नाही, तर आपल्या अर्थव्यवस्थेतील 'बँकिंग' क्षेत्राच्या अपयशावर बोट ठेवणारी आहे. एका आर्थिक वर्षात परवानाधारक सावकारांनी तब्बल १५० कोटी रुपयांचे कर्जवाटप करावे, ही बाब 'डिजिटल क्रांती' आणि 'वित्तीय समावेशकते'च्या (Financial Inclusion) मोठ्या दाव्यांमधील पोकळपणा उघड करते.

**बँकांचा उंबठा की सावकाराचे दार?**

आज भारतात जनधन खाती, युपीआय आणि मोबाईल बँकिंगचा प्रसार झाला असल्याचा गाजावाजा होत आहे. तरीही ठाणे आणि भिवंडीसारख्या शहरी भागात व्यापाऱ्यांना सावकारांकडे धाव घ्यावी लागत आहे, हे गंभीर आहे. याचे मुख्य कारण बँकांच्या जाचक अटी आणि कागदपत्रांचा डोंगर हे आहे. तातडीच्या गरजेसाठी एखाद्या छोट्या व्यावसायिकाला किंवा सामान्याला जेव्हा पैशांची गरज लागते, तेव्हा बँकांकडून मिळणारा प्रतिसाद अत्यंत संथ असतो. याउलट, सावकाराकडे कागदपत्रांची पूर्तता कमी आणि पैसा तात्काळ मिळत असल्याने 'तातडीची गरज' हा घटक सावकारांच्या फायद्याचा ठरत आहे.

**शहरी आणि ग्रामीण भागाचे विदारक वास्तव**

बातमीतील आकडेवारीनुसार, केवळ ग्रामीण भागच नाही तर ठाणे शहर (३४ कोटी), भिवंडी (३८ कोटी) आणि पनवेल (१८ कोटी) यांसारख्या विकसित शहरांमध्येही सावकारीचा विळखा घट्ट आहे. विशेषतः भिवंडी आणि कल्याणमधील व्यापारी वर्गाचा सावकारांवरील वाढता कल हा चिंतेचा विषय आहे. व्यापाऱ्यांना खेळते भांडवल मिळवण्यासाठी औपचारिक बँकिंग व्यवस्था अपुरी पडत असल्याचे हे निदर्शक आहे. पालघरसारख्या आदिवासी बहुल आणि ग्रामीण भागात तर बँकिंग पोहोचणे अद्यापही स्वप्नच असल्याचे वसई-डहाणूच्या आकडेवारीवरून दिसते.

**व्याजदराचे चक्रव्यूह आणि प्रशासकीय जबाबदारी**

परवानाधारक सावकारांवर सरकारचे नियंत्रण असले तरी, पडद्यामागे चालणारे व्याजाचे गणित अनेकदा सामान्यांना देशोधडीला लावणारे असते. बँकांपेक्षा कित्येक पट अधिक दराने व्याज आकारले गेल्यामुळे कर्ज घेणारा व्यक्ती कर्जाच्या विळख्यातून कधीच बाहेर पडू शकत नाही. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने केवळ आकडेवारी जाहीर करून थांबणे पुरेसे नाही. हे सावकारी जाळे का पसरत आहे, याचे मूळ शोधणे गरजेचे आहे.

**काय करण्याची गरज आहे?**

बँकिंग प्रक्रिया सुलभ करणे: लघु उद्योजक आणि सामान्य नागरिकांना विनासायास आणि कमी कागदपत्रांत तातडीचे कर्ज मिळेल, अशी यंत्रणा बँकांनी विकसित करणे काळाची गरज आहे.

शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी: शासनाच्या विविध कर्ज योजना केवळ कागदावर किंवा जाहिरातींपुरत्या मर्यादित न राहता त्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

कठोर नियमन: परवानाधारक सावकारांच्या कामकाजावर आणि व्याजदरावर प्रशासनाचे कडक लक्ष असणे गरजेचे आहे, जेणेकरून गरजवंतांची पिळवणूक होणार नाही.

वित्तीय साक्षरता: ग्रामीण आणि निमशहरी भागात लोकांमध्ये बँकिंग व्यवहारांबाबत जागृती वाढवणे आवश्यक आहे.


जोपर्यंत सामान्यांना सन्मानाने आणि सुलभतेने बँकांकडून कर्ज मिळत नाही, तोपर्यंत सावकारीचा हा पाश सैल होणार नाही. १५० कोटींचे हे आकडे केवळ चलनी नोटांचे नाहीत, तर त्यामागे हजारो कुटुंबांची हतबलता दडलेली आहे. सरकारने आणि बँकिंग क्षेत्राने याकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर विकासाच्या गप्पा मारताना आपला समाज आर्थिक गुलामगिरीच्या नव्या खाईत ढकलला जाईल, यात शंका नाही.

# उन्हाळयात कोणत्या प्रकारचे सनस्क्रीन आहेत उत्तम; दिवसातून किती वेळा लावावे?

उन्हाळा सुरू झाला आहे आणि सूर्य आग ओकत आहे. उन्हाळ्याच्या आगमानाबरोबरच तीव्र सूर्यप्रकाश आणि वाढत्या तापमानामुळे त्वचेशी संबंधित समस्या तोंड वर करू लागतात. त्वचा लाल होणे किंवा काळवंडणे म्हणजे टॅनिंग यासारख्या समस्या उन्हाळ्यात कॉमन आहेत. यामुळे त्वचा निरोगी ठेवण्यासाठी तज्ञ सनस्क्रीन लावण्याचा सल्ला देतात.

बऱ्याच लोकांचा असा गैसरमज आहे की, सनस्क्रीन फक्त सौंदर्य वाढवण्यासाठी लावलं जातं. मात्र, ते त्वचेसाठी खास करून सनबर्न टाळण्यासाठी उत्तम मानलं जातं. सूर्याच्या अतिनील किरणांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी सनस्क्रीन संरक्षण कवचाप्रमाणे काम करते. चला तर उन्हाळयात सनस्क्रीय का महत्त्वाचे आहे आणि कोणत्या प्रकारचे सनस्कीन वापरावे ते पाहूया...

तज्ञांच्या मते, उन्हाळ्यात सूर्यप्रकाश खूप प्रखर असल्यामुळे त्वचेच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सूर्यामध्ये अदृश्य अतिनील किरणे असतात. सनस्क्रीन त्वचेचे या किरणांपासून संरक्षण करण्यासाठी एका संरक्षक कवचाप्रमाणे काम करते. सनस्क्रीनमुळे त्वचेला उन्हामुळे भाजण्यापासून (सनबर्न) बचाव होतो, सुरकुत्या पडण्यास प्रतिबंध होतो आणि त्वचा काळवंडण्यावर (टॅनिंग) नियंत्रण ठेवता येते, असे अनेक फायदे होतात.



**सनस्क्रीनचे मुख्य फायदे**

उन्हामुळे होणारी जळजळ टाळणे: उन्हामुळे होणारी त्वचेचे लालसरपणा, सूज आणि सनबर्न यांसारख्या समस्या कमी करण्यासाठी सनस्क्रीन प्रभावी ठरते.

सुरकुत्या टाळणे: सूर्यप्रकाशाच्या अति संपर्कामुळे त्वचेवर लवकर सुरकुत्या पडू शकतात. मात्र, सनस्क्रीन वापरल्याने ही समस्या टाळता येते.

त्वचेच्या कर्करोगापासून संरक्षण: उन्हामुळे त्वचा भाजल्यास किंवा त्वचेचे नुकसान झाल्यास, दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने त्वचेचा कर्करोग होऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी सनस्क्रीन लावणे हा सर्वोत्तम उपाय आहे.

टॅनिंग नियंत्रण: सनस्क्रीन त्वचा काळी पडण्यापासून आणि डाग पडण्यापासून बचाव करते, तसंच त्वचेचा रंग एकसमान ठेवते.

**योग्य सनस्क्रीनची निवड कशी करावी?**

ब्रॉड स्पेक्ट्रम: हे UVA (सुरकुत्या पाडणारे किरण) आणि UVB (उन्हामुळे त्वचा भाजणारे किरण) यांपासून संरक्षण करते.

SPF ३० किंवा त्याहून अधिक: किमान SPF ३० असलेले उत्पादन वापरल्याने सुमारे ९७% किरणे रोखली जाऊ शकतात.

**त्वचेच्या प्रकारानुसार निवडा**

सनस्क्रीन लावल्यावर तुमचा चेहरा तेलकट किंवा खूप पांढरा दिसू नये यासाठी, तुम्ही तुमच्या त्वचेच्या प्रकाराला अनुकूल असलेले सनस्क्रीन खरेदी केले पाहिजे.

तेलकट त्वचा: तेलकट त्वचा असलेल्या लोकांनी 'जेल-आधारित' किंवा 'मॅट फिनिश' असलेले सनस्क्रीन निवडावे. यामुळे त्वचेवरील तेलकटपणा वाढत नाही.

कोरडी त्वचा: ज्या लोकांना कोरड्या त्वचेचा त्रास आहे, त्यांनी 'क्रीम-आधारित' किंवा मॉइश्चरायझर असलेले सनस्क्रीन वापरावे. यामुळे त्वचा मऊ राहील.

संवेदनशील त्वचा: या प्रकारची त्वचा असलेल्या लोकांसाठी, झिंक ऑक्साईड किंवा टायटॅनियम डायऑक्साइड सारखी रसायने कमी असलेले 'मिनरल सनस्क्रीन' वापरणे सर्वोत्तम ठरते.

**कसे वापरावे?**

वेळ: बाहेर जाण्यापूर्वी किमान २० मिनिटे आधी सनस्क्रीन लावा. यामुळे त्वचेचे संरक्षण होते.

वापरण्याची पद्धत: केवळ चेहऱ्यावरच नाही, तर मान, हात आणि पायांवरही, उन्हाच्या संपर्कात येणाऱ्या शरीराच्या प्रत्येक भागावर लावा.

पुन्हा लावणे: एकदा लावल्यावर ते दिवसभर टिकत नाही. म्हणून दर २ ते ३ तासांनी ते पुन्हा लावावे. जर तुम्हाला खूप घाम येत असेल किंवा तुम्ही पोहत असाल, तर तुम्ही ते आणखी लावावे.

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 2 ते 8 एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'!

भारत सरकार, क्षमता विकास आयोग (CBC) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने 2 एप्रिल ते 8 एप्रिल 2026 या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा-साधना सप्ताह 2 ते 8 एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत 8 लाख 80 हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी 7 दिवसांत किमान 4 तासांचे अभ्यासक्रम iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास 35 लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील 36 जिल्हे, 32 विभाग, आणि 6 विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठीसाधना सप्ताह हा iGOT कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम Mission Karmayogi चा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वत:च्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे,वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.




महा-साधना सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे iGOT Karmayogi App द्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृध्दी होण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वत:ची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

**महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत**

बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, ॲप्सचा वापर होत आहे. महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे.

या सप्ताहाच्या अनुषंगाने राज्यातील विविध शासकीय कार्यालये. जिल्हा कार्यालये यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान 4 तास असणे अनिवार्य आहे. सर्व अभ्यासक्रम 2 ते 8 एप्रिल दरम्यान पूर्ण करणे गरजेचे असून कर्मयोगी भारत पोर्टलवर सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (या विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये) तसेच विभागीय आयुक्त (विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हापरिषदा) या सर्वांनी साधना सप्ताहात एकूण 4 तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे राहील. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'TECH-वारी 2.0' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**वर्षा फडके - आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरापणामुळे संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले अमेरिकेचा राष्ट्रध्वज उलटा करून नागरिकांनी ट्रम्प यांचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनाला आंदोलनकर्त्यांनी नो किंग्ज असे नाव दिले. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिले. ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा ! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. या आंदोलनात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात महिलांची संख्याही लक्षणीय होती. ट्रम्प यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता इराणवर हल्ला केला. खामेनी यांची हत्या करून दोन चार दिवसात इराणवर सहज विजय मिळवू अशा थाटात इराणवर हल्ला करणाऱ्या ट्रम्प यांना महिना उलटून गेला तरी इराणवर विजय मिळवता आला नाही. इराणला शरण आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ट्रम्प यांच्यावरच आता युद्धातून माघार घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संपूर्ण जगात अमेरिकेची नाचक्की होत आहे ही बाब अमेरिकेच्या जनतेला आवडली नाही म्हणूनच ते ट्रम्प यांच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरत आहे अर्थात ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन लोक रस्त्यावर उतरण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षभरापूर्वी स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली होती. त्या आंदोलनाला आंदोलकांनी गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले होते. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य




केंद्र होते. या आंदोलनातही लाखो नागरिक रस्त्यावर जमले होते. त्यावेळी सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला होता. ते आंदोलन शांततेत पार पडले तरी त्या आंदोलनातही आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला होता. त्याआधीही अमेरिकन लोकांनी ट्रम्प यांच्याविरोधात रस्त्यावर उतरून असेच आंदोलन केले होते त्या आंदोलनाला हँडस ऑफ असे नाव दिले होते. त्या आंदोलनातही लोकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त करणाऱ्या घोषणा दिल्या होत्या. आताचे आंदोलनही त्याच धर्तीवर शांततेत पार पडत असले तरी लोक ट्रम्प यांच्या विरोधात तितकाच रोष व्यक्त करत आहेत. या आंदोलनाविषयी सांगताना आंदोलनकर्ते म्हणतात आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे आंदोलनकर्ते सांगत आहेत. या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील हे आंदोलनही शांततेत पार पडत असल्याने कोणालाही अटक करण्यात आले नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे. ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीला इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले याचा परिणाम जितका जगावर झाला तितकाच तो अमेरिकेवर देखील झाला. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती निर्माण झाली. ट्रम्प यांनी हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत. आता तर इराणवर हल्ला करून ट्रम्प यांनी अमेरिकन जनतेला महागाईच्या खाईत लोटले. ट्रम्प यांच्या या सर्व निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.



श्याम ठाणेदार

# सांस्कृतिक मुशाफिरी : संवादिनी वादनातून संगीत आराधना



विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्याद्वारे समाजाच्या घडणीमध्ये योगदान देणाऱ्या संस्थांचे मोहोळ ही पुण्याची ओळख आहे. वक्तृत्वोत्तेजक संस्था, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, वेदशास्त्रोत्तेजक संस्था, पुणे प्रार्थना समाज, पुणे भारत गायन समाज, गोपाळ गायन समाज, गांधर्व महाविद्यालय अशा संस्थांची वानगीदाखल नावे घेता येतील. यातील बहुतांश संस्थांनी शतकोत्तर परंपरा पार केली आहे. नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे या संस्था आपापल्या परीने योगदान देत असतात. गुढीपाडवा ते रामनवमी असे सलग नऊ दिवस गुरुसमवेत शिष्यांनी मिळून १००८ तास अखंड संवादिनी वादन करून संगीताची आराधना केली.

संवादिनी हे म्हटलं, तर गायन मैफलीत साथसंगत करणारे वाद्य. पण, या वाद्याची स्वतंत्र वादनाची क्षमता ध्यानात घेऊन रियाझ करण्यासाठी उद्युक्त करण्याचे काम गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने गेल्या चार दशकांपासून केले जात आहे. या वर्षीच्या मालेत इयत्ता चौथीमध्ये शिकणारी नारायणी लोहार हिच्यापासून ते ७७ वर्षांचे महादेव गाडगीळ असे विविध वयोगटातील ६० विद्यार्थी कलाकार यामध्ये सहभागी झाले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य व प्रसिद्ध संवादिनी वादक प्रमोद मराठे, परिणीता मराठे आणि नरेंद्र चिपळूणकर या गुरुंसमवेत विद्यालयात दररोज पहाटे सहा ते रात्री दहा या कालावधीत तर, रामनवमीच्या दिवशी पहाटे सहा ते रामजन्मापर्यंत म्हणजे दुपारी साडेबारापर्यंत संवादिनी वादनातून विद्यार्थ्यांनी रियाझ करण्याबरोबरच संगीताची आराधना केली. गुहागर येथील मयुरेश गाडगीळ या दृष्टिहीन युवकासह चिंचवड येथील हर्षवर्धन वाघमडे विद्यालयामध्येच वास्तव्यास होता. मराठी नववर्षासाठी अमेरिकेतून पुण्यात आलेल्या वर्षा फडके आणि देवेन वहाणे, तर सिंगापूर येथून पुण्यात आलेले सचिन वर्तक या स्वरयज्ञामध्ये सहभागी झाले होते. सहभागी बहुतांश विद्यार्थ्यांनी किमान शंभर तासांचे संवादिनी वादन केले.

'चार दशकांपूर्वी म्हणजे १९८६ मध्ये अजित पळशीकर आणि गिरीश दाते या तबलावादक मित्रांसमवेत मी हा उपक्रम सुरू केला होता. त्या वेळी केवळ रामनवमीच्या आदल्या दिवसापासून ते रामजन्माच्या वेळेपर्यंत २४ तासांचा संवादिनी वादनाचा रियाज केला जात असे. ज्येष्ठ गायिका डॉ. वीणा सहस्रबुद्धे यांनी काही वर्षे भजन सादरीकरणाच्या माध्यमातून यामध्ये सहभाग घेतला. गेल्या दोन दशकांपासून विद्यार्थी संख्येची भर पडल्यानंतर संवादिनी वाजनाच्या रियाझाचा हा स्वरयज्ञ गुढीपाडवा ते रामनवमी असा करण्यात आला आहे. या उपक्रमामागची भावना आणि त्याचे पावित्र्य जपत विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग तर घेतातच. पण, आपले वादन परिपूर्णतेच्या दिशेने कसे जाईल याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यासाठी धडपडतात,' अशी माहिती प्रमोद मराठे यांनी दिली. गुढीपाडव्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम म्हणजे संगीत साधनेची अपूर्व संधी देणारी एक प्रकारे चळवळ झाली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**सांगीतिक संस्थांचा गौरव**

गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले यांनी स्थापन केलेली पुणे भारत गायन समाज आणि गोपाळ गायन समाज या संगीत क्षेत्रात शतकोत्तर परंपरा लाभलेल्या प्रतिष्ठित संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. वि. रा. उर्फ बापूसाहेब परांजपे आणि कमलाबाई परांजपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्येष्ठ रेडिओलॉजिस्ट डॉ. रामचंद्र विष्णू परांजपे आणि रमा परांजपे यांनी या संस्थांचा सन्मान करताना दोन्ही संस्थांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे अर्थसाह्य केले. सारसबागेतील पेशवे सभागृहात झालेल्या कार्यक्रमास श्री देवदेवेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश भागवत, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, अधिश पायगुडे आणि डॉ. राधिका परांजपे या वेळी उपस्थित होत्या. पुणे भारत गायन समाज संस्थेच्या वतीने अध्यक्षा शैला दातार, शिल्पा पुणतांबेकर, सावनी दातार तर, गोपाळ गायन समाजाच्या वतीने डॉ. विकास कशाळकर, राधिका जोगळेकर यांनी धनादेश स्वीकारला.

'माझे वडील भारत गायन समाज येथे आणि आई गोपाळ गायन समाज येथे जात असे. बालगंधर्व यांचे पुण्यात आमच्या घरी मुक्कामी येत असत. अनेक गायक यानिमित्ताने घरी येत होते. त्यामुळे संगीत क्षेत्राशी आमची जवळीक होती. नव्या पिढीला घडविण्याचे काम करणाऱ्या संस्थांना छोटी मदत करता आली हे भाग्य आहे,' अशी भावना परांजपे यांनी व्यक्त केली.

# मनोकामना पूर्तीसाठी हनुमान जयंतीला करा 'हे' उपाय

चैत्र महिन्यात रामनवमीनंतर काही दिवसांनी हनुमान जयंतीचा उत्सव साजरा केला जातो. पंचांगानुसार हनुमान जयंतीचा उत्सव दरवर्षी चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला साजरा केला जातो.हिंदू धर्मात हनुमानाला कलियुगातील देव मानले जाते. हनुमान जयंतीच्या दिवशी उपवास करून योग्य विधीनुसार पूजा केल्याने सर्व त्रास दूर होतात आणि ग्रह-नक्षत्रांचे शुभ फळ देखील मिळते. तसेच कोणत्याही समस्येपासून मुक्तता मिळणे असो किंवा भूत आणि नकारात्मक शक्तींपासून मुक्तता मिळणे असो, संकटमोचन हनुमान त्यांच्या भक्तांच्या प्रत्येक समस्येचे निराकरण करतात, अशी धार्मिक मान्यता आहे. या वर्षीच्या हनुमान जयंतीची तिथी, शुभ मुहूर्त आणि पूजा पद्धत जाणून घेऊया..

**यंदा हनुमान जयंती कधी?**

यंदा हनुमान जयंती गुरुवार, २ एप्रिल रोजी साजरी केली जाणार आहे. पंचांगानुसार, पौर्णिमेची सुरुवात १ एप्रिल रोजी सकाळी ०७ वाजून ०६ मिनिटांनी होत आहे तर २ एप्रिल रोजी सकाळी ०७ वाजून ४१ मिनिटांनी संपणार आहे. उदयतिथीनुसार चैत्र पौर्णिमा गुरुवार, २ एप्रिल रोजी आहे त्यामुळे हनुमान जयंती देखील या दिवशी असणार आहे. हनुमान जयंती 'हनुमंतोत्सव' म्हणूनही ओळखली जाते.

**रामनाम जप**

भगवान हनुमान हे रामभक्त आहेत. त्यामुळे त्यांना प्रसन्न करण्यासाठी सर्वात प्रभावी आणि शक्तिशाली उपाय रामनाम जपाचा आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी राम नाम या मंत्राचा ११ वेळा किंवा संकल्प घेऊन १ लाख रामनाम जप करावा. तसेच रामनाम जप तुम्ही लिहू देखील शकता. एका वहीत लाल पेनाने स्वच्छ अक्षरात रामनाम जप लिहिल्याने मारुती प्रसन्न होतात.

**हनुमान चालीसा पठण**

हनुमान जयंतीच्या दिवशी सकाळी लवकर उठून हनुमानचालीसा पठण करावे. अखंड ज्योत लावून या दिवशी किमान १,५,७,११ अशा क्रमाने तुम्ही जमेल तितक्यावेळा हनुमानचालीसा वाचू शकता. या दिवशी हनुमान चालीसाचे पठण केल्याने मन शांत होते आणि नकारात्मक विचार दूर होतात.

**सुंदरकांड पठण**

हनुमानजींना भगवान श्रीराम प्रिय असल्याने त्यांना



समर्पित असणारा सुंदरकांडचा पाठ यादिवशी करावा. हनुमान मंदिरांमध्ये देखील यादिवशी सुंदरकांड पाठचे आयोजन केले जाते. या दिवशी सुंदरकांड पठण करणे शुभ मानले जाते.

**नारळाचा उपाय**

नारळ घ्या त्याला हळद, लाल धागा आणि अक्षता वाहून भगवान हनुमान यांच्या चरणी अर्पण करा. त्यानंतर हनुमान चालिसाचे २१ वेळा पठण करा. मग तो नारळ एका लाल कापडात गुंडाळून घरात ठेवा. हा उपाय नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी उपयुक्त मानला जातो.

**दिवा**

या दिवशी पिंपळाच्या झाडाखाली मोहरीच्या तेलाचा दिवा लावल्याने नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि हनुमानजींचे संरक्षण मिळते.

**हनुमान जयंती पूजाविधी**

-सकाळी लाल किंवा नारंगी कपडे घालून उपवास करा.

-जर घरीच पूजा करत असाल तर एका ठिकाणी चौरंग ठेवून गंगाजलाने जागा शुद्ध करा.

-त्यानंतर लाल कापड घालून चौरंगावर भगवान हनुमानाची मूर्ती किंवा चित्र ठेवा. तसेच भगवान राम आणि माता सीता यांचे चित्रेही ठेवा.

-हनुमानजींना सिंदूर, तुळशीची पाने, लाल फुले अर्पण करा आणि बुंदीच्या लाडूचा नैवेद्य दाखवा. धूप लावा.

-त्यानंतर हनुमान चालीसा आणि सुंदरकांड पठण करा.

-नंतर तुपाचा दिवा आणि कापूर लावून हनुमानजीची आरती करा आणि प्रसाद ग्रहण करा.

-शक्य असल्यास हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घ्या.

# मुलांनी जेवावं यासाठी हातात मोबाईल देताय?

हल्ली कित्येक घरात लहान मूल जेवत नसेल तर सरळ पालक मुलांच्या हातात मोबाईल देतात. मोबाईल देऊन कार्टून्स, गाणी बघण्यास भाग पडतात. तुम्ही एकदा मुलांना जेवताना मोबाईल दाखवण्याची चूक केल्यास दररोज त्यांना या गोष्टीची सवय लागते. हे केवळ जेवणापुरतं मर्यादित राहीलं नसून कुठेही बाहेर गेल्यावर मूल एकाजागी शांत बसण्यासाठी, सतत रडत असेल तर त्याला शांत करण्यासाठी पालक मोबाईल मुलांच्या हातात देत आहेत.

पालकांना शांतता मिळावी यासाठी मुलांच्या हातात दिलेली मोबाईल सवय सोयीची वाटत असली तरी कालांतराने हे डोईजड होऊ शकते. हळूहळू मुलांना माहीत होतं की आपण आरडा-ओरडा केला, रडलो तर



आई-बाबा आपल्याला मोबाईल देणार आहेत. ही गोष्ट एकदा मुलांच्या लक्षात आल्यावर मुले पालकांकडून मोबाईल कसा मिळवायचा याचे तंत्र शिकतात. तज्ज्ञांच्या मते ही सवय मुलांना ८ ते १०महिन्यापासून लागते, ज्याचे भविष्यात व्यसनात रुपांतर होते.

तज्ज्ञांच्या मते मुलांचा शारीरिक विकास होण्यासाठी त्यांच्या शरीरात विविध पोषकतत्वे जाणे आवश्यक आहे. यासाठी मुलांनी पूर्ण लक्ष देऊन जेवण करणे गरजेचे असते. याशिवाय जुन्या पिढीच्या मते, जेवण करताना लक्ष दुसरीकडे गेल्यास जेवण अंगाला लागत नाही. यासह टीव्ही किंवा मोबाईल पाहताना लक्ष विचलित होते. त्यामुळे आपण किती खात आहोत, काय खात आहोत याच भान राहत नाही. अनेकदा जास्त प्रमाणात खाल्लं जातं किंवा व्यवस्थितपणे चावून खाल्लं जात नाही. ज्यामुळे लठ्ठपणा, अपचन, ॲसिडिटीसारख्या समस्या सुरू होतात.

मुले सतत स्क्रीनच्या संपर्कात आल्याने डोळ्यांचे आजार, झोपेच्या समस्या, चिडचड अशा त्रासाला सामोरे जावे लागते. अशावेळी पालकांनी स्वत:हून मुलांना मोबाईलपासून दूर ठेवायला हवे.

तुमचं मूल लहान असेल तर त्याच्याशी गप्पा मारत, त्यांना गोष्टी सांगत भरवणे आवश्यक आहे. जर मुलाचे वय ३ ते ५ वर्ष असेल तर संपूर्ण कुटूंबाने एकत्र जेवायला हवे. एकदरंच, मुलांचे वय कितीही असो त्याच्यासमोर कुटूंबाने एकत्र येत गप्पागोष्टी करायला हव्यात. अशा गप्पांमधून मुलं भावनिकदृष्ट्या अधिक मजबूत होतात. त्यांच्यामध्ये संवादकौशल्य वाढतं.